बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | सोमवार,दि.२ मे २०२५ | वर्षे४थे | अंक२८५वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# युक्रेनचा ड्रोन हल्ला!

४० लढाऊ विमाने नष्ट रशियाचा अद्याप दुजोरा नाही

रशिया- युक्रेन यांच्यात गेल्या ३ वर्षांपासून युद्ध सुरु

स्पायडरवेबद्वारे रशियात स्पेशल ऑपरेशन सुरु

## रशियाच्या ४ एअरबेस केल्या उद्ध्वस्त

मॉस्को:वृत्तसंस्था

रशिया आणि युक्रेन यांच्यात गेल्या ३ वर्षांपासून युद्ध सुरु आहे. या युद्धाला आगामी काळात विराम मिळेल, अशी चर्चा असतानाच आज युक्रेनने रशियातील ओलेन्या आणि बेलान्या या ४ एअरबेसवर शक्तिशाली हल्ला केला. यूक्रेनच्या सैन्याने यासाठी ड्रोनचा वापर केला. या हल्ल्यात ४० हून अधिक रशियन लढाऊ विमाने नष्ट झाल्याचा दावा युक्रेनने केला आहे. या विमानांचा वापर रशियाकडून यूक्रेनवर बॉम्ब हल्ला करण्यासाठी केला जात होता. त्यामुळे ही लढाऊ विमाने युक्रेनने नष्ट केली. परंतु रशियाने या हल्ल्याला अद्याप अधिकृत दुजोरा दिलेला नाही.



दरम्यान, या हल्ल्याचे व्हिडीओदेखील समोर आले आहेत. या व्हिडीओत लढाऊ विमानांना आग लागलेली बघायला मिळत आहे. युक्रेनने रशियाच्या ओलेन्या आणि बेलाया यासह आणखी २ एअरबेसवर हल्ला करून या एअरबेसवरील ४० लढाऊ विमाने नष्ट केली. हल्ला बरोबर लढाऊ विमानांवरच करण्यात आल्याचा दावा केला जात आहे. विशेष म्हणजे ज्या एअरबेसवर हल्ला केला ते रशिया आणि युक्रेनच्या बॉर्डरपासून खूप लांब आहेत. तरीदेखील युक्रेनकडून इतका मोठा हल्ला केला.ड्रोनने रशियाच्या क्षेत्रात जाऊन बॉम्बर्स विमानांवर हल्ले केले. टीयू-९५, टीयू-२२ आणि ए-५० सारख्या हेरगिरी करणा-या विमानाला नुकसान पोहोचवले. रशियाकडून ज्या एअरबेसचा वापर हा युक्रेनवर बॉम्ब हल्ले करण्यासाठी केला जात होता, त्याच एअरबेसवर युक्रेनने हल्ला केला आहे. युक्रेनच्या सुरक्षा एजन्सी दिलेल्या माहितीनुसार युक्रेनने रशियाच्या सैन्याचे मोठे नुकसान केले आहे. त्यांनी ४० पेक्षा जास्त विमानांना लक्ष्य केले. रशिया हे विमान युक्रेनवर मिसाइल हल्ल्यासाठी वापरत होते.

### यूक्रेनकडून चार हवाई तळावर हल्ले

यूक्रेनने ऑपरेशन स्पायडरवेबद्वारे रशियात स्पेशल ऑपरेशन सुरु केले. यूक्रेनने हा हल्ला रशियाच्या दीर्घ टप्प्यातील हल्ल्याची क्षमता खिळखिळी करण्याचा प्रयत्न केला. युक्रेनने रशियाच्या ४ हवाई तळांवर असलेल्या ४० लढाऊ विमानांवर हल्ला केला. यात बेलाया एअरबेस, ओलेन्या, ड्यागिलेवो आणि ल्वानोवे एअरबेसवर ड्रोन हल्ला केला.

### लढाऊ विमानांना लक्ष्य

यूक्रेनकडून ज्या विमानांवर हल्ले करण्यात आले ती रशियासाठी महत्त्वाची आहेत. टीयू-९५ हे १९५० च्या दशकातील जुने विमान आहे. हे विमान अजून देखील क्रूझ मिसाईल घेऊन जाण्यास सक्षम आहे. जे दूर अंतरावरच्या शहरांना लक्ष्य करु शकते. टीयू-२२ हे लढाऊ विमानही तितकेच महत्त्वाचे आहे.

### सर्वांत मोठा ड्रोन हल्ला

युक्रेनने रशियावर हल्ल्यांसाठी ड्रोनची मदत घेतली असून, ज्या ठिकाणी हल्ले केले, ती ठिकाणे रशिया-युक्रेनच्या सीमेपासून फार दूर आहेत. युक्रेनमधील माध्यमांनुसार युक्रेनच्या सैन्याने आतापर्यंतचा सर्वांत मोठा ड्रोन हल्ला केल्याचा दावा केला आहे. मात्र, रशियाने अद्याप या हल्ल्याला दुजोरा दिलेला नाही.

## पर्यावरणाचे संवर्धन आपली जबाबदारी

धोरण:प्लास्टिक विरोधात जनजागृती



पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:देशाचे जबाबदार नागरिक म्हणून पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणे, नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करून प्रदूषण कमी करणे, तसेच वन्यजीव आणि वनस्पतींचे संरक्षण ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. हा कार्यक्रम धार्मिक स्थळाच्या परिसरात पर्यावरणपूरक सवयी रुजविण्याबरोबरच पुढच्या पिढ्यांसाठी स्वच्छ आणि हरित भविष्य घडवण्याच्या दृष्टिकोनातून महत्वाचे पाऊल ठरणार असल्याचा विश्वास पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला.

आज मुंबईतील सिद्धिविनायक मंदिर परिसरात नागरिकांमध्ये सिंगल युज प्लास्टिक टाळण्याचे आवाहन तसेच सिंगल यूज प्लास्टिक बंदीबाबत जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मंत्री श्रीमती. मुंडे बोलत होत्या. या कार्यक्रमास सिद्धिविनायक मंदिर समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.मंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, सिंगल युज प्लास्टिकचा भस्मासुर रोखायलाच हवा, सिंगल युज प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे याकरिता सिंगल युज प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळण्यासाठी संकल्प, संयम आणि प्रत्यक्ष कृती याची नितांत गरज आहे. शासन स्तरावर सिंगल यूज प्लास्टिकच्या वापरामुळे होणाऱ्या पर्यावरणीय समस्यांना आळा घालण्यासाठी वेळोवेळी महत्त्वपूर्ण पावले उचलली जात आहेत. यासाठी विभागामार्फत प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी प्रभावी धोरणे आणि नियम ही लागू करण्यात आले आहेत. सिंगल यूज प्लास्टिकवर निर्बंध घालण्याबरोबरच, जनतेमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी शाळा, कॉलेज, आणि सार्वजनिक ठिकाणी जागरूकता मोहिम देखील राबवल्या जात आहेत. कार्यशाळा, चर्चासत्रे, आणि विविध शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरणाच्या संवर्धनाचा संदेश पोहोचवला जात आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या उपक्रमा अंतर्गत मंत्री पंकजा मुंडे यांनी सिद्धिविनायक मंदिर परिसरातील स्टॉलधारकांना प्लास्टिक पिशव्यांचा वापर थांबवण्याचे सांगत स्वत: कापडी पिशव्यांचे वाटप करून पर्यावरणपूरक पान २ वर

## बडतर्फ कासलेला दिल्लीतून अटक

दणका:दोन दिवसांची पोलीस कोठडी



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: येथील सायबर ठाण्यातील बडतर्फ पोलीस अधिकारी रणजीत कासलेला सोशल मीडियावर नेत्यांवर गंभीर आरोप करणे अंगलट आले आहे. रविवारी सकाळी कासलेला मुंबई गुन्हे शाखेने अटक केली आहे. महत्वाचे म्हणजे बीडमधील ॲट्रासिटीच्या दाखल गुन्ह्यात नुकताच तो बीड जिल्हा कारागृहारातून जामीनवर बाहेर आला होता.

लोकप्रतिनिधींची बदनामी करण तसेच जातींमध्ये द्वेष निर्माण केल्याप्रकरणी रणजीत कासलेला अटक करण्यात आली. रणजीत कासलेला दिल्ली येथे अटक करण्यात आली. त्याला न्यायालयासमोर हजर केले असता दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. गुजरात राज्यात जाऊन आरोपींशी आर्थिक तडजोड केल्याच्या पान २ वर

## पुन्हा एकदा राष्ट्रवादीची धुरा

निवड: गेवराई तालुकाध्यक्षपदी अण्णासाहेब राठोड

पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई:बंजारा समाजा सोबतच सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारे, तळागाळातील लोकांचे प्रश्न आपल्या मनमिळाऊ स्वभावाने मार्गी लाऊन उपेक्षित घटकांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे, लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आदराने वागणूक देणारे, पक्ष वाढीसाठी अहोरात्र मेहनत घेऊन पक्षश्रेष्ठी च्या माध्यमातून पक्षाचे आचार विचार लोकांत रुजवून पक्षासाठी व समाजसेवेसाठी वेळ देणारे आण्णासाहेब राठोड यांची पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तालुका अध्यक्ष पदी निवड झाली असून या निवडीने



त्यांचे सर्व स्तरातून स्वागत होऊ लागले आहे.

या बाबत सविस्तर माहिती अशी की, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी बीड जिल्ह्यातील सर्व अकरा तालुका अध्यक्षांच्या नावांची घोषणा जाहीर केली. जिल्ह्याचे लोकप्रिय खा. बजरंग बाप्पा सोनवणे, आ. संदिप क्षीरसागर, माजी आमदार, जेष्ठ नेते मंडळी यांचेशी चर्चा करून निवडी करण्यात आल्या असल्याची माहिती जिल्हध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे. राजेंद्र मस्के यांची जिल्हाध्यक्ष पदावर निवड झाल्यानंतर सर्व नेते पदाधिकारी कार्यकर्ते यांचेशी चर्चा करून राष्ट्रवादी भवन बीड येथे जिल्ह्याची व्यापक बैठक घेऊन जुनी कार्यकारिणी बरखास्तीची घोषणा केली होती. त्यानंतर जुन्या नव्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन तालुका निहाय बैठका घेण्यात आल्या. प्रत्येकांशी संवाद साधण्यत आला. तालुका अध्यक्ष कसा असावा कोण असावा याबाबत अनेकांचे मत विचारात घेण्यात आले. पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना सोबत घेऊन नवीन माणसं जोडणारा असावा. तालुक्यातील जनता व कार्यकर्त्यांना वेळ देणारा, सर्वांना सोबत घेऊन तालुकाभरात काम करणारा व्यक्तीची निवड करावी. अशी प्रतिक्रिया सामान्य कार्यकर्त्यां मधून आल्या नंतर गेवराई तालुक्याच्या बाबतीत हे सर्व गुण अण्णासाहेब राठोड यांच्यात असून लोकसभा निवडणुकीत खासदार बजरंग पान २ वर

## अरेबियन ज्वेलर्स विरोधात गुन्हा

बोंबला:सचिन ज्वेलर्सची २३ लाखाची फसवणूक




पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:वेगवेगळ्या योजनांचे आमिष दाखवून नागरिकांकडून यामध्ये सहभागी करून घेतले. गेल्या काही दिवसांपासून बीड येथील अरेबियन ज्येलर्सला टाळे लागल्यानंतर आपली फसवणुक झाल्याचे लक्षात येताच एका सराफा व्यवसायिकाने दिलेल्या फिर्यादीवरून अरेबियनच्या संचालकाविरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

शहरातील सर्वसामान्य नागरीकांना मोठ-मोठया बक्षिसांचे आमिष दाखून लक्की ड्रॉच्या नावाखाली अरेबियन ज्वेलर्सच्या मालकाने कोटयावधी रूपये उकळले. त्यानंतर दिड महिन्यापासून ते दुकानही शटरबंद आहे. त्यामुळे सर्व सामान्यांमध्ये संभ्रम निर्माण झालेला असतांनाच आता अरेबियन ज्वेलर्सने केलेले कारनामे पोलीस पान २ वर

## डॉ.योगेश क्षीरसागर | बीडमध्ये विद्यार्थ्यांचा सत्कार

# प्रगतीसाठी शिक्षणच उत्तम पर्याय

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: लोणारी समाज संख्येने कमी असला, तरी शिक्षणाच्या माध्यमातून आपले अस्तित्व सिद्ध करत आहे. पारंपरिक व्यवसाय जवळपास लोप पावल्याने आता प्रगतीसाठी शिक्षण हा उत्तम पर्याय उरला आहे. समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षणासोबतच नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी समाजातील दोन होतकरू युवकांना संस्थेमध्ये संधी देण्याचा निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड मतदारसंघ अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांनी दिली.




बीड जिल्हा लोणारी समाज सेवा संघाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन शहरातील लोणारपुरा येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, पत्रकार ड.संदीप बेदरे उपस्थित होते. प्रास्ताविक संघाचे अध्यक्ष अनिल मुळेकर यांनी करताना समाजाच्या कार्याचा व इतिहासाचा परिचय दिला. यावेळी बोलताना कल्याणराव आखाडे यांनी ओबीसी समाजासाठी असलेल्या विविध शासकीय योजना व महामंडळांची माहिती उपस्थितांना दिली. समाज संघटन मजबूत करून, समाज माझा आहे, संघटना आपली आहे ही भावना प्रत्येकाच्या मनात रुजली पाहिजे, असे ते म्हणाले. मार्गदर्शन करताना ड. संदीप बेदरे यांनी सांगितले, गुणवंत विद्यार्थी म्हणजेच भाग्यवंत विद्यार्थी. त्यांच्या मेहनतीचं फळ आज समाज त्यांच्या पाठीशी उभा राहून देत आहे. दहावी, बारावीनंतरही उत्तम शिक्षण घेऊन ते उच्च पदांवर पोहोचावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शैक्षणिक साहित्य, पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र पान २ वर

## 'एमपीएल'मध्ये बीडच्या खेळाडूंची निवड

क्रीडा:क्रिकेट असोसिएशनच्या शिरपेचात मानाचा तुरा



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या पाच खेळाडूंनी महाराष्ट्र प्रीमियर लीग (एमपीएल) स्पर्धेसाठी निवड सुनिश्चित केली आहे. यामध्ये सचिन धस (कोल्हापूर टस्कर्स), ऋषिकेश सोनवणे (पुणेरी बाप्पा), सौरभ नवले आणि देव नवले (सातारा वॉरियर्स), तसेच समर्थ कदम (रत्नागिरी जेट्स) या खेळाडूंचा सहभाग आहे.

ही निवड केवळ खेळाडूंच्या मेहनतीचे फलित नसून बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या पारदर्शक आणि गुणवत्तेला प्राधान्य देणाऱ्या निवड प्रक्रियेचेही प्रत्यक्ष फलित आहे. अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्रे, ब्रँडेड सुविधा आणि मोठ्या आर्थिक पाठबळाचा अभाव असूनही बीडचे खेळाडू राज्यस्तरावर चमकत आहेत, ही बाब निश्चितच जिल्ह्यासाठी गौरवाची आहे. या यशाबद्दल खेळाडूंना बीड पान २ वर

## पेरावं की थांबवावं

जगावं की मरावं' असा प्रश्न 'नटसम्राटा'ला पडला होता, तशीच काहीशी दोलायमान परिस्थिती सध्या शेतक–याची झाली आहे. शेतीसाठी अनुकूल हवामान अत्यंत आवश्यक असते. मात्र, गत काही वर्षांत हवामानातील अनिश्चिततेमुळे शेतक–यांचे गणित वारंवार चुकत आहे. यंदा तर त्याचा कहर झालेला दिसतो. मे महिन्यात अवकाळी पावसाने दमदार हजेरी लावल्याने काही भागात ढगफुटीसदृश पाऊस, गारपीट तर काही भागात वादळवा–याने पिकांचे अतोनात नुकसान केले. हवामानातील या बदलामुळे शेतकरी गोंधळून गेला आहे.

पारंपरिक पद्धतीनुसार मे अखेरपर्यंत शेतकरी पेरणीसाठी मशागतीत मग्न असतो. परंतु यंदा एप्रिल अखेरपासूनच अवकाळी पावसाने थैमान घालण्यास सुरुवात केल्याने शेतक–याला शेतीची मशागत करण्यास वेळच मिळाला नाही. शेतात कमालीचा ओलावा असल्याने नांगरणी करता आली नाही. हवामान खात्याचे अंदाजही अनेकवेळा चुकीचे ठरतात, त्यामुळे अचूक निर्णय घेणे शेतक–यांना अवघड जाते. तो कायम द्विधा मन:स्थितीत असतो. या पार्श्वभूमीवर कृषि विभाग, कृषि विद्यापीठ व सरकारने शेतक–यांना योग्य वेळी अचूक आणि त्या त्या भागातील हवामानानुसार सल्ला देणे ही काळाची गरज आहे. शेतक–यांच्या हतबलतेचा फायदा घेऊन बोगस बियाणे, खते विक्री करणा–या टोळ्याही सक्रिय होतात. सरकारने त्यांचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे. तसेच शेतक–यांना विश्वासार्ह मार्गदर्शन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अवकाळी पाऊस केवळ एक हवामान घटक नसून तो शेतक–यांच्या कष्टांवर, भविष्यावर आणि स्वप्नांवर परिणाम करणारा महत्त्वाचा मुद्दा आहे.

सध्या शेतक–यासमोर 'पेरावं की थांबावं' असा गहन प्रश्न उभा आहे. त्याचे उत्तर देण्यासाठी हवामानावरील संशोधन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शाश्वत कृषि धोरण राबवायची गरज आहे. 'नेमेचि येतो मग पावसाळा' ही म्हण आता वापरून गुळगुळीत झाली असली तरी सरकार आणि प्रशासन त्यापासून बोध कधी घेणार हा प्रश्न अनुत्तरितच आहे. देशाची आर्थिक राजधानी आणि जागतिक दर्जाच्या शहरातील सर्व सेवा–सुविधा पहिल्याच पावसात कोलमडून पडत असतील तर असे का होते आणि याला जबाबदार कोण? हा प्रश्न उपस्थित होतो. कोट्यवधी रुपये खर्च करूनही मुंबईतील नालेसफाई झालीच नाही. फक्त या कामाची पाहणी करून फोटो काढले गेले. पण ही कामे कशी होतात, त्यात किती भ्रष्टाचार होतो हे कॅमे–यात कैद झालेच नाही. पावसावरून सत्ताधारी व विरोधकांत राजकारण सुरू होते. भाजप आणि शिंदे गट मुंबई महानगरपालिकेत २५ वर्षे सत्तेत असणा–या शिवसेनेला (उबाठा) दोष देत आहेत. पण ज्यावेळी ते सत्तेत एकत्र होते, तेव्हा गप्प का होते? मुंबई महापालिकेवर प्रशासन असो की राजकीय पक्षाची सत्ता, मुंबईकरांचे हाल होणे काही थांबत नाही. २६ जुलै २००५ रोजी आलेल्या पुराचा भयानक अनुभव अजूनही ताजा आहे.परंतु त्यापासून सरकार आणि प्रशासनाने काहीच बोध घेतलेला नाही. दरवर्षी पर्जन्यवृष्टी एक नवीन धडा शिकवून जाते, पण त्यातून सरकार आणि प्रशासन काही बोध घेताना दिसत नाही, ते कधी दिसेल? राज्यात यंदा मान्सूनने १२ दिवस आधीच हजेरी लावली. उत्तर महाराष्ट्रात पावसाने धुमाकूळ घातला. गत ४–५ दिवसांपासून राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत जोरदार पाऊस पडत आहे. २६ मे रोजी मान्सून राज्यात दाखल झाल्यानंतर आता तो सर्वच भागात पसरला आहे. पुढील काही दिवसांतील पावसाच्या प्रवासाबाबत पुणे वेधशाळेने म्हटले आहे की, बंगालच्या उपसागरात तयार झालेला कमी दाबाचा पट्टा आता उत्तरेला सरकल्यामुळे महाराष्ट्रात पुढील पाच ते सहा दिवसांत पाऊस विश्रांती घेण्याची शक्यता आहे. ३० मे नंतर मान्सूनचा प्रवास ओसरण्याची शक्यता आहे. नागपूर वेधशाळेने म्हटले आहे की, दोन दिवसांत पूर्व विदर्भात मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. मात्र, ३० मे नंतर पावसाचा जोर कमी होऊ शकेल. पुढील दोन दिवसांत पावसाचा प्रवास थंडावणार असल्यामुळे शेतक–यांनी पेरणीची घाई करू नये. १०० मिमी पाऊस होईपर्यंत शेतक–यांनी पेरणी करू नये, असे हवामान विभागाने म्हटले आहे. यंदा सरासरीपेक्षा अधिक पाऊस कोसळेल असा अंदाज आहे.

यावेळी ११० टक्क्यांच्या जवळपास पावसाचे प्रमाण राहू शकते, तसेच देशाच्या दक्षिण आणि मध्य भागात अधिक पाऊस होण्याची शक्यता आहे. पहिल्याच पावसाने राज्यातील अनेक जिल्ह्यांत मोठे नुकसान केले आहे. आता मान्सून मराठवाडा आणि विदर्भात पोहोचला आहे. दोन्ही भागात मुसळधार पाऊस होईल असा अंदाज आहे. पुढील पाच दिवस मुसळधार पावसाचे आहेत. मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात मान्सूनपूर्व पाऊस विश्रांती घेण्याची शक्यता आहे. मुंबई, कोकण, नगर, पुणे, नाशिक या भागात पावसाचे प्रमाण जास्त राहील. बाकी विभागात १ ते ६ जूनपर्यंत सूर्यदर्शन होईल. त्यावेळी शेतक–यांनी नांगरणी, वखरणीची कामे उरकून घ्यावीत आणि पुढे जमिनीत पुरेसा ओलावा आल्यानंतरच पेरणीचा निर्णय घ्यावा असे हवामान अभ्यासकांनी म्हटले आहे. महाराष्ट्रात ३० मे पासून पुढील पाच ते सहा दिवस मोसमी वा–यांचा वेग मंदावणार आहे.वा–यांचा प्रवास अतिशय मंदगतीने होत राहील. त्यामुळे राज्यात काही दिवस पाऊस विश्रांती घेण्याची शक्यता आहे. पावसात सातत्य राहणार की खंड पडणार याकडे सध्या शेतक–यांचे लक्ष आहे. कृषि विभागाने मात्र पेरणीची घाई करू नये असा सल्ला दिल्याने गोंधळ वाढला आहे. राज्याच्य कृषि विभागाने यंदा मोसमी पावसाचा हंगाम लवकर सुरू झाला असला तरी पेरणीची घाई करू नये असा सल्ला दिला आहे. याचा अर्थ पावसाचा खंड पडू शकतो. खरीप हंगामासाठी एप्रिलमध्ये तयारी सुरू होते. परंतु यंदा या कालावधीतच पाऊस सुरू झाल्याने शेतक–यांना मशागतीची संधीच मिळाली नाही. साधारण पेरणीलायक पाऊस हा विदर्भात १३ जून, मराठवाड्यात २१ जून आणि उत्तर महाराष्ट्रात १७ जूनपासून अपेक्षित आहे. त्यामुळे सध्या जगाच्या पोशिंद्यासमोर 'पेरावं की थांबावं' असा प्रश्न आहे.

# बांझ चित्रपट लवकरच प्रसिद्ध

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:गीता मराठा तरुण गरीब घराण्यातील सिद्धार्थ या श्रीमंत बौद्ध तरुणाच्या प्रेमात पडते जात या कारणावरून गीताच्या घरचे लग्नाला विरोध करतात गीताचा भाऊ जयराज पैशाच्या लालसने. जातीतील श्रीमंत पण विधुर आणि व्यसनी भुजबरावांशी गीताचे लग्न लावून देतो भुजंगराव गीतावर अन्याय अत्याचार करतो गीताचे जीवन उध्वस्त करतो वर्ष झाले तरी गीताला मूल होत नाही म्हणून सासू गीताचा छळ करते सासु सकट शेजारणी गीताचा वाझेश्रटी वांझोटी म्हणून असा असह्य छळ करतात डॉक्टर कडे गीता आणि भुजबरावांची तपासणी होती तपासणी अहवालात गीता आई बनू शकते पण भुजंगराव बाप बनू शकत नाही हे स्पष्ट होते पुरुषी अहंकाराने भुजंगराव



अहवाल. फाडून टाकतो आणि वांझोटी म्हणून गीताला हाकलून देतो वांझोटी म्हणून गीताला पुरुषप्रधान व्यवस्थेचे पुरुष लग्न करण्यास नकार देतात ना इलादस्तव ओळखीने शहरातील कलेक्टर च्या घरी मुलांना शिकवायला व घर कामाला गीताला पाठवले जाते कलेक्टर बौद्ध असतात आणि कलेक्टरचा थोरला भाऊ मुका व विधुरअसतो.

काही प्रसंग असे घडतात की कलेक्टर च्या भावाकडून गीता गरोदर रहाते गीताचा भाऊ कलेक्टरला ब्लॅकमेल करण्यापर्यंत प्रयत्न करतो पण गीता सांगते माझ्यावर कोणी जबरदस्ती केली नाही कलेक्टर त्याची आई वडील गीताला सून म्हणून स्वीकारायला आनंदाने तयार असतात पण जाती अहंकाराने गीताचा भाऊ आणि घरचे लग्नाला विरोध करतात तू गर्भपात कर नाहीतर मी जीव देईल आईच्या या धमकीने गीता मोठ्या दुःखाने गर्भपात करण्यास तयार होते पण त्यानंतरही गीता वांझोटीच राहते का मनुवादी व्यवस्था आजही स्त्रीला गुलाम म्हणूनच वागवते मूल जन्माला घालणारी श्री एक मशीनच आहे अशी विचारधारा बाळगते मूल न होणाऱ्या स्त्रीचा वांझोटी म्हणून अतोनात असा छळ करते हे प्रत्यक्ष सत्य घटनेवर आधारित बांझ या हिंदी चित्रपटात प्रत्यक्ष पडद्यावर प्रेक्षकां करिता लवकरच प्रदर्शित होत आहे. निर्मिती संस्था टास्क फिल्म. लेखक निर्माता. दिग्दर्शक भीम पुत्र टेक्सास गायकवाड मुख्य कलाकार. कशिश. प्रबुद्ध कुमार. भीमदास आरु आनंदकुमार डॉ कीर्तीपाल. भारत भगत रंजना भीमराव मंदाकिनी भोसले. धर्मपाल तंतरपाळे. किशोर गायकवाड मंगल नागमोडे राहुल कुमार मीना सुरेश. सुरेश गायकवाड. अंजली खांडेकर. विजय किशन. संजय सायरे. कल्याण श्रावस्ती संघपाल शिरसाट करुणा शिरसाट ड.डॉ.बाबा वानखडे आणि भीम पुत्र टेक्सास गायकवाड.

# केजमध्ये तलाट्याचा मनमानी कारभार!

## चर्चा:केज प्रशासनाला निवेदन

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: तालुक्यातील सर्व तलाठ्यांनी आपापल्या सज्जावर उपस्थित राहावे असे निवेदन केज तालुका शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या वतीने तहसीलदार साहेब यांना देण्यात आले .केज तालुक्यातील एक ही तलाठी सज्जवर उपस्थित राहत नाहीत ते तालुक्याच्या ठिकाणी बसून कारभार हाकतात शासनाने दिलेले सज्जवरील शासकीय कार्यालय पडले धूळखात काही ठिकाणी तलाठी कार्यालयात जुगार खेळला जातो, काही ठिकाणी तलाठी कार्यालय बनले जनावरांचे गोठे

शासनाने लाखो रुपये खर्च करून जनतेच्या सोयीसाठी इमारती उभ्या केल्या परंतु त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत नाही पीक विमा , अनुदान अशा अनेक योजना साठी तलाठी कार्यालयातील कागदपत्राची आवश्यकता असते पण सज्जवरिल तलाठी कार्यालयात तलाठी हजर नसतात आठ दिवसात तलाठी आपापल्या सज्जावर उपस्थित न राहिल्यास शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने अमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा केज तालुका शवसेनेच्या वतीने तालुका प्रमुख अशोक जाधव यांनी दिला आहे यावेळी उपजिल्हा प्रमुख दीपक बप्पा मोराले , युवासेना तालुका प्रमुख किशोर घुले, शहर प्रमुख तात्या रोडे, तालुका सचिव सखाराम वयबसे , जिल्हा संघटक दिलीप जाधव, उपशहर प्रमुख पप्पू ढगे , अशोक कोल्हे , महादेव घोळवे , प्रभाकर शिंदे, नारायण तांदळे, व शिवसेना पदाधिकारी , शिवसैनिक उपस्थित होते.




## पान एक वरून

**पर्यावरणाचे संवर्धन**

जीवनशैलीकडे वळण्याचे आवाहन केले. तसेच या कार्यक्रमाच्या वेळी प्लास्टिकच्या पर्यायांविषयी माहिती देणारे सूचना फलकांबरोबरच पर्यावरण जनजागृतीच्या घोषवाक्यांनी मंदिर परिसराचे वातावरण दुमदुमून गेले. पर्यावरण रक्षणासाठी शासन, संस्था आणि नागरिकांनी एकत्र येवून काम केल्यास नक्कीच सकारात्मक बदल दिसून येतील असेही मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी सांगितले. यावेळी सिद्धिविनायक ट्रस्टने सुद्धा प्लास्टिक बंदीसंबंधी जनजागृती कार्यक्रमात सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

**बडतर्फ कासलेला दिल्लीतून**

आरोपानंतर निलंबित करण्यात आलेला बीड सायबर ठाण्यातील उपनिरीक्षक रणजित कासले हा निलंबनानंतर अधिक चर्चेत आला. विविध वादग्रस्त दावे त्याने केले. त्यामुळे त्याच्यावर परळी, अंबाजोगाई व बीड पोलिसांत चार गुन्हे नोंद झाले होते. अ‍ॅट्रॉसिटी प्रकरणात महिनाभर कारागृहात राहिल्यानंतर त्याला जामीन मिळाला. जामीन मिळताच त्याने पुन्हा वादग्रस्त वक्तव्य आणि व्हिडीओंची मालिका सुरु ठेवली.दोन दिवसांपूर्वी त्याने मंत्री संजय सिरसाट यांच्याबाबत वादग्रस्त वक्तव्य करुन व्हिडीओ समाज माध्यमावर टाकला होता. बीडचे शिवसेना जिल्हा प्रमुख स्वप्निल गलधर यांनी याबाबत तक्रार दिल्यानंतर सायबर पोलिसांत रणजित कासले विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. त्यामुळे आता कासलेच्या अडचणीत वाढल्या होत्या. असे असतानाच त्याला दिल्ली येथे अटक करण्यात आली.

**पुन्हा एकदा राष्ट्रवादीची**

सोनवणे निवडून आणण्यासाठी जीवाचे रान करून लोकसभेमध्ये गेवराई विधानसभा मतदारसंघातून पहिल्यांदा भरघोस लीड देऊन खासदार बजरंग सोनवणे यांना खासदार करण्यासाठी हातभार लावला विधानसभा निवडणूक मध्येही पक्षाने दिलेले आदेश व महाविकास आघाडीने दिलेल्या उमेदवारासाठी तन–मन–धनाने काम केले.

या सर्व बाबीचा विचार करून जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या तालुका अध्यक्ष पदी अण्णासाहेब राठोड यांची नेमणूक केली व राष्ट्रीय नेते शरदचंद्र पवार साहेब याचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्या साठी, सामान्य जनते सेवा आणि अन्याय अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन ताकदीने काम करावे. अशी अपेक्षा व्यक्त करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. या निवडीने तालुका भरातून तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांचे स्वागत केले जात आहे.

**अरेबियन ज्वेलर्स विरोधात**

रेकॉर्डवर येऊ लागले आहेत. शहरातील पिंगळे गल्ली येथील सचिन ज्वेलर्समधुन अरेबियन ज्वेलर्सचा मालक महेबुब मालिक (वय ४४ रा. लक्ष्मण नगर बीड) याने दि.२९ मे २०२४ रोजी २३ लाख रूपये किंमतीचे ३१३ ग्रॅम सोने ग्राहकाला दाखवण्यासाठी नेले होते.

याविषयी डहाळे यांनी वारंवार पैसे द्या, किंवा सोने परत करा अशी मागणी केली. परंतू प्रत्येक वेळी त्याने उडवा उडविची उत्तरे देऊन फसवणूक केली अशी तक्रार सचिन ज्वेलर्सचे मालक सचिन डहाळे यांनी पोलीस ठाण्यात दिली आहे. या प्रकरणी अरेबियन ज्वेलर्सचा मालक महेबुब मलीक याच्याविरूध्द शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोउपनि जाधव करीत आहेत.शहरातील नागरिकांना बुलेट, फोर व्हिलर, अलिशान फ्लॅट असे विविध आमिष दाखवून येथील अरेबियन ज्वेलर्सकडून दाखविण्यात येत होते. यामध्ये लोक अडकले गेले. या माध्यमातून मोठी फसवणूक झाली आहे.

**'एमपीएल'मध्ये बीडच्या खेळाडूंची**

जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर, कार्याध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, सचिव आमेर सलीम, तसेच महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, मनोज जोगदंड, जावेद पाशा, रिजवान खान, शेख आरेफ, अतीक कुरेशी, सुनील गोपी शेट्टी, गोपाल गुरखूदे, सरफराज मोमीन, अक्षय नरवडे, पठाण शाहरुख आदींनी अभिनंदन केले आहे.

**प्रगतीसाठी शिक्षणच उत्तम**

देऊन करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गणेश अभिमन्यू मुळेकर यांनी केले. या कार्यक्रमाला माणिक दोडमिसे, नामदेव खांडेकर, नुकुल मुळेकर, किरण निंबाळकर, सुरज दोडमिसे, विनोद मुळेकर, विनोद ढेंबरे, मंगेश ढेंबरे, मनोहर दोडमिसे, संजय उंडे यांच्यासह समाजबांधव आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान सहा वरून

**टोमॅटोचा झाला चिखल;लाखो रुपये**

झालेल्या मान्सूनपूर्व अवकाळी पावसामुळे तोडणीला आलेला टोमॅटो अक्षरशः पाण्यात गेला. त्यामुळे या टोमॅटोचा शेतामध्ये अक्षरशः चिखल झाला आहे. या शेतकऱ्याने पोटाला चिमटा घेऊन लावलेल्या टोमॅटो पिकाचे डोळ्यादेखत ९०% नुकसान झाले. त्यामुळे या शेतकऱ्याला लाखो रुपयांचा आर्थिक फटका पावसामुळे बसला. मागील चार ते पाच दिवसात अवकाळी पावसामुळे या शेतकऱ्याच्या टोमॅटो पिकाचे लाखो रुपयाचे नुकसान झाले. मात्र, अद्याप महसूल किंवा कृषी विभागाचा एकाही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने त्यांच्या बांधावर जाऊन झालेल्या नुसकानीची पाहणी करण्याची तसदी घेतलेली दिसत नाही. त्यामुळे या शेतकऱ्याने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

**देखभाल दुरुस्तीकडे कानाडोळा**

महावितरण दुरूस्तीचा कांगावा करत आहे. त्यामुळे आजही अनेक भागात विद्युत वाहिन्या लोंबकळत असल्याचे चित्र आहे. अनेक भागात विशेषतः ग्रामीण भागात खांबाची अवस्था दयनीय झाली आहे. शहरासह ग्रामीण भागात विजेचा खांब आणि विद्युत वाहिन्यांवर झाडांच्या फांद्या तर काही ठिकाणी झाडांच्या गर्दीतच खांब उभा असल्याची स्थिती आहे.

**पाटोदा येथे विद्यार्थ्यांचा**

ढवळे लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूल:जानकी अभिजीत वैद्य, असीम समीर सय्यद, ओमकार भाऊसाहेब सावंत संत बाळूमामा हायस्कूल पाटोदा: सागर किसन मामडगे, बाजीराव विष्णू मोरे, रितेश गौतम वाघमारे उर्दू शाळा पाटोदा:आर्शिया जावेद शेख, उनेजा सय्यद जहीर, सय्यद उमेआयमन अ. वाहीद,जय भवानी कनिष्ठ महाविद्यालय (इ. बारावी):प्रणव नितीन बामदळे, मीना सुभाष नांदेवसंतराव नाईक महाविद्यालय (इ. बारावी): प्राची प्रकाश भोसले, ओमराजे प्रवीण काळे, निखिल नितीन जाधव पद्मभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालय:मानसी माणिक जायभाय, वैष्णवी सुभाष मुंडे, प्रणव सतीश दिक्षीत,महिला महाविद्यालय पाटोदा: संस्कृती गीते, रिया ऋषिकेश गायकवाड, सृष्टी वीरेंद्र नागरगोजे श्री जगदंबा विद्यालय,धनगरजवळका:रुपाली राजेश यादव, लक्ष्मण बंडुपंत काळे, श्रावणी बाळासाहेब टेकाळे जिल्हा परिषद माध्यमिक शाळा थेरलाचे वायबसे दुर्गा ज्ञानेश्वर, राख सानवी पांडुरंग,नागरे अंकिता बाबासाहेब, राख वैष्णवी भागवत,धनराज संजय सानप, जुवाना रहिम शेख, उमा श्रीरंग काकडे, संचित संतोष भवर स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालय, मुगाव: दहावीत दोन नंबर या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी मराठी पत्रकार परिषदेचे तालुका अध्यक्ष प्रा.अजय जोशी, जिल्हा उपाध्यक्ष कदरभाई मकरानी, सचिन पवार, उपाध्यक्ष शेख जावेद, अनिल गायकवाड, अशोक भवार, सचिव हमीद खान पठाण, सदस्य पवनकुमार भोकरे, दिगंबर नाईकनवरे,सतीश गर्जे,संजय सानप, सचिन शिंदे,सय्यद सज्ञात यांच्यासह पालक व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे संयोजन अत्यंत उत्तम व शिस्तबद्ध झाले. विद्यार्थ्यांनीही यशानंतर त्यांच्या शिक्षक,पालक आभार मानले.

**पावसामुळे सौरऊर्जा प्रकल्पाचे**

कंपनीकडे केली आहे या वादळी पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे कांदा , उडिद,भिमुंग,तीळ,ज्वारी कडबा आणी फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शासनाने शेतकऱ्यांना मदत करावी असे शेतकरी वर्गातून मागणी होत आहे.

**सुनंदा कोरडेंचा झाला**

केले. यावेळी बोलताना प्रमुख व्याख्याते डॉ. अशोक बांगर म्हणाले की, राजाच्या मनामध्ये रयतेप्रती कोणता भाव आहे? हा विषय सगळ्यात महत्वाचा असतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनामध्ये, ' हे राज्य व्हावे ही तो श्रींची इच्छा' हा भाव होता. आणि याच भावनेतून ईश्वराला समर्पित राज्यकारभार महाराजांनी केला. त्याच धर्तीवर राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी शिवाला अर्थात शंकराला समर्पित असा राज्यकारभार केला. केवळ राज्यातच नव्हे तर संबंध भारतवर्षात अहिल्यादेवींनी स्वतःच्या खाजगी संपत्तीतून मंदिरे, अन्नछत्रे, तलाव, पानवठे आदि समाजाभिमुख व लोकोपयोगी कामे पार पाडल्याचेही बांगर म्हणाले. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या १३ महिलांचा अहिल्यारत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये संगीता श्रीराम पांडे, आशा नामदेव साबळे, सत्यभामा संतोष मोरे, सुमित्रा राजाभाऊ सोन्नवर, पार्वती हरिदास तपसे, विद्या महादेव रासवे, सुगना सत्यनारायण तेला, इंदुबाई राजाराम अन्नदाते, राणी चंद्रकांत पोपळे, उर्मिला राजाभाऊ काळे, मीनाक्षी देवकते (डोमाळे), सुनिता राजेश कुलथे यांचा समावेश आहे. याच कार्यक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित वक्तृत्व व निबंध स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजपाचे शहराध्यक्ष विनायक मामा रत्नपारखी, अभिजीत सोळंके, रूपाली कचरे, प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर , ज्ञानेश्वर सरोदे, मनोज कोरडे, विशाल देवकते, अविनाश कांडुरे आदींनी परिश्रम घेतले.

**राजमाता अहिल्यादेवींना**

पडोळे,गोरख चौधरी दत्तू भूकन, सतीश सातपुते, सचिन चौधरी, रवींद्र भुकन, कल्याण चौधरी इत्यादी मान्यवरांसह ग्रामस्थ उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितांकडून राजमाता अहिल्यादेवींच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

**नागरिक संघाला अधिकृत**

सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व केज संघाचे कोषाध्यक्ष रामेश्वर जाजू यांनीही आपले विचार मांडले. जेष्ठांचे वाढदिवस ––यावेळी मे–जून मध्ये वाढदिवस असणाऱ्या केज जेष्ठ नागरिक संघाच्या बारा सदस्यांचे वाढदिवस शाल, फेटा व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते साजरे करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघाचे सहसचिव डी एस साखरे सरांनी केले. सुत्रसंचालन हनुमंत भोसले यांनी केले तर आभार माजी प्राचार्य लक्ष्मणराव जाधव यांनी मानले. कार्यक्रमाला सत्तरहून अधिक जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

**सेवापुर्तीचा मान्यवरांकडून**

परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे तसेच राजेंद्र नायर मुकेश कुलथे ग्रामसेवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष युवराज पाटील दै पुण्यभूमी व प्रबुद्ध भारतचे जिल्हा प्रतिनिधी आप्पासाहेब मकासरे अनुप गायकवाड आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. जिल्हा परिषदेच्या विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी यांच्या कडुन उमाप यांचा सेवापुरती कार्यक्रम निमित्ताने सत्कार करण्यात आला या वेळी उमाप यांचा पत्नी व नातवंडे जिल्हा परिषदेच्या सन्मानानी भावुक झाले


संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## ‘गझलेचा आत्मा म्हणजे कारुण्य’

**कल्याण :** गझल ही उर्दूमधून मराठीमध्ये आली, तिला मराठीने स्वीकारले तेव्हढे अन्य भारतीय भाषांनी स्वीकारले नाही. गझलचा आत्मा म्हणजे आर्त, व्याकुळ कारुण्य असून वलास घेऊन, ऑनलाईन कविता, गझल करता येत नाही, ती रक्तात असावी लागते असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक अशोक बागवे यांनी ठाणे येथे केले. नवी मुंबईकर साहित्यिक अशोक गुप्ते यांच्या ‘हे झाड चेतनेचे’ या गझल संग्रहाचे प्रकाशन नुकतेच मराठी ग्रंथसंग्रहालय सभागृहामध्ये पार पडले. त्याप्रसंगी ते प्रमुख पाहुणे या नात्याने बोलत होते. याप्रसंगी विचारमंचावर ज्येष्ठ कवी साहेबराव ठाणगे, कवी सतीश सोळांकुरकर, ज्येष्ठ पत्रकार दुर्गेश सोनार, संवेदना प्रकाशनचे नितिन हिरवे व कवी अशोक गुप्ते उपस्थित होते. ‘हे झाड चेतनेचे' या पुस्तकाचे अर्थपूर्ण मुखपृष्ठ बनवणाऱ्या सतीश भावसार यांचाही सत्कार यानिमित्त करण्यात आला.

# खारेगाव नाका ते पाखाडीत महानगर गॅस वाहिनीमुळे चिखल रस्त्यावर

### महापालिका सार्वजनिक बांधकाम विभाग कंपनी ठेकेदाराचे दुर्लक्ष

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

खारेगाव नाका ते पाखाडी भागात महानगर गॅस कंपनीच्या ठेकेदाराने गॅस वाहिनी टाकण्यासाठी खोदलेल्या वाहिन्यांमध्ये पाणी साठले असून त्यामधील काढलेली माती, दगड न उचलल्याने गेले दोन दिवस पडलेल्या पावसात या मातीचा चिखल झाला आहे. त्यामुळे येथील नागरिकांना रस्त्यावरून चालणे अवघड झाले आहे तर रस्त्याच्या कडेला बसणारे भाजीवाले व इतर गरीब फेरीवाल्यांना रस्त्यावर आपल्या धंद्यासाठी बसणे अवघड झाले आहे.

महानगर गॅस कंपनीच्या ठेकेदाराने ठाणे महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून परवानगी घेऊन काम सुरू केले, असे असताना सार्वजनिक बांधकाम विभागाने संबंधित कंपनी ठेकेदाराला पाऊस सुरू होण्याआधी माती व खोदलेली वाहिनी बुझवण्याची तंबी देणे आवश्यक असताना महापालिकेचे नियम गॅस कंपनी ठेकेदाराने धाब्यावर बसवले आहेत. त्यामुळे हा चिखल व या गटार वाहिनीतून कुजलेल्या कचऱ्यामुळे या रस्त्यावर घाणीचे ढीग साचले आहेत. गेल्या आठ दिवसांपासून हा गाळ काढून टाकला असून संध्याकाळच्या वेळी येथे गाड्यांच्या रांगा लागून वाहतूक कोंडी होते तसेच त्यामध्ये डासांची पैदास होत आहे त्यामुळे साथीचे आजार पसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच गॅस कंपनीच्या ठेकेदाराने कळव्यातील जुना बेलापूर रस्त्यावरील शंकर मंदीर परिसरात ही रस्ते खोदून ठेवल्याने तेथे अरुंद रस्त्यामुळे वाहतूक कोंडी होते. नुकताच पाऊस पडल्याने रस्त्यावरून जाणाऱ्या संतोष भोईर याची रिक्षा पलटी होऊन अपघात झाला तो रुग्णालयात उपचार घेत आहे. रस्त्याच्या कडेला खोदलेल्या वाहिन्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना चालणे अवघड होत असल्याने त्यांनी संताप व्यक्त केला आहे या खोदल्या वाहिन्या व रस्ते बुजवण्याची मागणी खारेगाव येथील माजी नगरसेवक उमेश पाटील यांनी मागणी करून ही त्याकडे कळवा प्रभाग समितीचे अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचा त्यांनी आरोप केला आहे. या खोदलेल्या वाहिनी व रस्ते त्वरित बुझविण्याची मागणी येथील नागरिकांनी केली आहे.



> येत्या तीस तारखेपर्यंत कळवा प्रभाग समितीच्या हद्दीतील महानगर गॅस कंपनीच्या ठेकेदाराने रस्त्याच्या कडेला खोदलेल्या वाहिन्या त्वरित बुजविण्याचे आदेश दिले असून न बुझविल्यास कारवाई केली जाईल.
>
> **- महेश अमृतकर,** कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कळवा प्रभाग समिती

> महानगर गॅस कंपनीच्या ठेकेदाराने रस्त्याच्या कडेला खोदलेल्या वाहिन्या त्वरित बुजविण्याची मागणी करूनही त्याकडे दुर्लक्ष केले जाते याकडे महापालिका सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे त्यांना भेटून जाब विचारणार आहे.
>
> **- उमेश पाटील,** माजी नगरसेवक, खारेगाव

> या रस्त्यावर खोदलेली वाहिनी न बुझवल्याने आम्हाला रस्त्यावर बसावे लागते त्यामुळे आमचे नुकसान होत आहे"
>
> **- प्रेमकुमार मिश्रा,** भाजी विक्रेता

अतिरिक्त आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली पथक सज्ज

## आय प्रभागात रखडलेले रस्ता रुंदीकरण, गटारीचे काम सुरू



◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

कल्याण- डोंबिवली नगरपालिकेच्या आय प्रभागात गेल्या दोन वर्षांपासून रखडलेले रस्ता रुंदीकरण व गटारीचे काम अखेर सुरू करण्यात आले. अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे आणि उपायुक्त अवधूत तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त भारत पवार यांच्या पथकाने या कामास सुरुवात केली.

दरम्यान, या ठिकाणी असलेल्या गटारांमुळे येथे पावसाळ्यात पाणी भरण्याचे प्रमाण वाढत होते. त्यामुळे अनेक ठिकाणी पाणी साचून येथील इमारतींनाही या पाण्याचा त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे ही कामे लवकर सुरु झाल्याने येथील रहिवाशांना नक्कीच दिलासा मिळाला आहे. कामाला सुरुवात करताना माणेरे गावातील काही गाळेधारक आणि स्थानिक नागरिकांकडून कामात अडथळा निर्माण करण्यात आला होता. त्याचबरोबर संबंधित भागात तणावाची स्थिती निर्माण झाली होती. पोलीस प्रशासनाने परिस्थिती शांत ठेवण्याचा प्रयत्न केला, महापालिकेतील कर्मचाऱ्यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, तसेच मागील कृष्णानगरी चाळीमध्ये पावसाचे पाणी शिरू नये म्हणून महापालिकेने तत्काळ ११ गाळेधारकांवर निष्कासन कारवाई केली. यामध्ये अनधिकृत शेड, ओटे आणि अडथळा निर्माण करणारे साहित्य काढून टाकण्यात आले. त्यानंतर वादग्रस्त ठिकाणी जुनी गटार व्यवस्था शोधून काढण्यात आली. कारण या गटारांचे पाणी कृष्णा नदीत सोडले जात होते. त्यामुळे याचा एक वेगळा परिणाम येथील रहिवाशांना सहन करावा लागत होता. त्यामुळे ही जुनी गटार व्यवस्था मुख्य नाल्याशी मार्किंगनुसार जोडण्यात आली. निष्कासन कारवाईनंतर रस्ता रुंदीकरण व गटारीचे काम त्वरित सुरू करण्यात आले असून, नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने संबंधित भागात रेडियम पट्ट्या व 'डेंजर' अशी चिन्हे लावण्यात आलेली आहेत. महापालिकेच्या या तातडीच्या आणि ठोस कारवाईमुळे गेली अनेक महिने रखडलेले महत्त्वाचे काम मार्गी लागले असून, लवकरच परिसरातील नागरिकांना सुधारित रस्ता आणि सांडपाणी निचरा सुविधांचा लाभ मिळणार आहे.

## भात बियाणे ५०% अनुदानाने मिळणार

**मुरबाड :** पंचायत समिती मुरबाड येथे जिल्हा परिषद सेस योजना सन २०२५/२६ अंतर्गत ५० टक्के अनुदानाने भात बियाणे मिळणार आहेत. कर्जत-३(वाटाणा) ७२ क्विंटल, (MTU) एम टी यु १०१०,१०० क्विंटल भात प्राप्त झाला आहे. (पॅकिंग साइज,२५ किलोची आहे) जास्तीतजास्त शेतकऱ्यांनी ५० टक्के अनुदानाने भात बियाणे वाटपाचा लाभ घ्यावा असे आव्हान मुरबाड पंचायत समिती गटविकास अधिकारी डॉ. लता गायकवाड, सहाय्यक गटविकास अधिकारी चिंतामण लोहकरे, पंचायत समिती कृषी अधिकारी रणजित जाधव, विस्ताराधिकारी कृषी, रवींद्र चौधरी यांच्यामार्फत करण्यात आले आहे.


## वेचक

## 'सफाई कर्मचाऱ्यांना मिळणार वारसा हक्क'

**ठाणे :** ठाणे महापालिकेतून सेवा निवृत्त, स्वेच्छा निवृत्त तसेच मयत झालेल्या सफाई कामगारांच्या वारसाहक्काने महापालिकेच्या सेवेत येणाऱ्या १५ जणांचे नियुक्ती आदेश प्रशासनाने निर्गमित केल्याने सर्व सफाई कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसा हक्क लागू व्हावा यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार नरेश म्हस्के यांनी शासनाकडे वारंवार पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्याला यश आले असून सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसा हक्क मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला असून प्रलंबित वारसा हक्काच्या नियुक्ती तातडीने कराव्यात असे निर्देश खासदार नरेश म्हस्के यांनी प्रशासनाला दिले आहेत.ठाणे महापालिकेतील जे सफाई कर्मचारी सेवानिवृत्त, मयत वा ज्यांनी स्वेच्छा निवृत्ती घेतली आहे, अशा कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार वारसा हक्क लागू होतो, त्या अन्वये त्यांना महापालिकेच्या आस्थापनेवर सफाई कर्मचारी या संवर्गात नियुक्तीची तरतूद आहे. याबाबत सर्व सफाई कर्मचारी यांना वारसा हक्क देणेबाबत शासन निर्णयास उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे आव्हान करण्यात आले होते. या रिट याचिकेमध्ये ८ जानेवारी २०२५मध्ये जे स्थगिती आदेश आहेत ते उच्च न्यायालयाने उठवून वारसा हक्काने सर्व सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना नियुक्ती आदेश देणेबाबत शासनाने निर्देश दिले होते. या निर्णयाच्या अनुषंगाने सामाजिक न्याय व वित्त मंत्रालयाने अखेरीस सर्व सफाई कर्मचाऱ्यांच्य वारसांना नियुक्ती आदेश देणेबाबत आदेश दिले. याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार नरेश म्हस्के यांनी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे शासनस्तरावरुन सफाई कर्मचाऱ्यांना वारसा हक्काने नियुक्ती देण्याचा मार्ग मोकळा झाला.

## शाळेची भिंत कोसळून एक ठार, दोन जखमी

**कल्याण :** केडीएमसी हद्दीतील अ प्रभाग क्षेत्रातील बल्याणी परिसरातील केबीके इंटरनँशनल खाजगी शाळेची भिंत कोसळल्याच्या




घटनेत एका लहान मुलाचा मृत्यु तर दोन लहान मुले गंभीर जखमी झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी घडल्याने परिसरात एकच हळहळ व्यक्त होत आहे. यानिमित्ताने खाजगी शाळा बांधकाम प्रश्न ऐरणीवर आला असल्याचे दिसत आहे. टिटवाळा ग्रामीण पोलिस स्टेशनच्या हद्दीतील बल्याणी परिसरातील एस के नगर जवळील केबीके इंटरनँशनल् या खाजगी शाळेची संरक्षक भिंत शुक्रवारी संध्याकाळी चार वाजण्याच्या सुमारास कोसळली. यावेळी शेजारील श्री कृपा चाळ परिसरातील लहान मुले खेळत होती. त्यापैकी अंशुकुमार सिंह या चिमुकल्याचा मृत्यु झाला. तसेच अभिषेक साहानी, शोएब शेख हे गंभीर जखमी झाले. दोन्ही मुलावर रूग्णालयात उपचार सुरू असून घटनेत अंशुकुमार सिंह याचा दुर्दैवी मृत्यु झाल्याचे रूक्मिणीबाई रूग्णालयातील डॉक्टरांनी घोषित केले. स्थानिक चाळकरी रहिवाशांनी यानिमित्ताने आरोप केला की, केबिके शाळेची संरक्षण भिंत धोकादायक झाली होती. या बाबत शाळाप्रशासनाला तक्रार केली होती. मात्र शाळा प्रशासनाने थातुरमातुर डागडुजी करीत दुर्लक्ष केल्याने ही घटना घडली. या घटनेने खाजगी शाळा इमारत बांधकाम, संरक्षण भिंत प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## अर्जुन ढाकणे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**कल्याण :** कल्याण येथील अभिनेते, कवी लेखक, गझलकार दिवंगत अर्जुन ढाकणे यांचे नुकतेच अकस्मात अपघाती निधन झाले. अर्जुन ढाकणे हे पू. ल. कट्टा कल्याण या संस्थेचे संस्थापक सदस्य होते. त्या अनुषंगाने अर्जुन ढाकणे यांच्या गुणांचा जागर करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पू. ल. कट्टा संस्थेने फुल कट्टा वाचनालय नक्षत्र उद्यान कल्याण येथे नुकतेच श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नाट्य दिग्दर्शक, सिने, नाट्य अभिनेते राम दौंड यांनी श्रद्धांजली वाहिली. अभिनय करताना त्याने आपल्यातला कवि कधीच आपल्या अभिनेत्यावर हावी होऊ दिला नाही. तो काळाच्या पुढचा अभिनेता होता असे माझे मत आहे असे त्यांनी सांगितले. उपस्थित पू ल कट्टा संयोजक प्रा महेंद्र भावसार, किशोर खराटे, संजय वाजपेयी, रमेश आव्हाड, ज्योती अय्यर, विजय यांनी अर्जुन ढाकणे यांच्या आठवणी, किस्से सांगून त्यांच्या आरस्पानी या काव्यसंग्रहातील कविता सादर करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी अर्जुन ढाकणे यांची मुले अद्वैत,स्वामी ही उपस्थित होते.

## कल्याण परिमंडलात महापुरुषांची संयुक्त जयंती साजरी



◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

महावितरणच्या कल्याण परिमंडलाकडून आयोजित करण्यात आलेल्या महामानवांच्या जंयती उत्सवाचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे लेखक व व्याख्याते बलभिम माथेले यांनी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित महामानवांच्या संयुक्त जंयती उत्सवात स्पष्ट केले.

सलग चौथ्या वर्षी परिमंडलाकडून संयुक्त जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा होते. माथेले यांनी आपल्या भाषणात छत्रपती शिवाजी महाराज ते महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील वैचारीक नात्याची गुंफण उलगडली. तसेच भगवान गौतम बुद्धांपासून संत परंपरेतील नामदेव, ज्ञानेश्वर, तुकाराम, रोहिदास, सेवालाल, गाडगेबाबा आदी संतांचे विचार सांगितले. यावेळी कल्याण मंडल एकचे अधीक्षक अभियंता अनिल थोरात, कल्याण मंडल दोनचे अधीक्षक अभियंता विजय फुंदे, सहाय्यक महाव्यवस्थापक सुशिल पावसकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. अभियंते, अधिकारी, कर्मचारी, विविध संघटनांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पांडुरंग गायके यांनी केले. तर औदुंबर कोकरे यांनी आभार मानले.

# 'नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव द्या'

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**



लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यासंदर्भातला प्रश्न केंद्र शासनाकडे प्रलंबित असल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये असंतोष पसरला आहे. राज्य शासनाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत तातडीने लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करुन नाव जाहिर करावे. अन्यथा असंतोषाचा स्फोट होईल, असा इशारा कृती समितीच्यावतीने अध्यक्ष, ज्येष्ठ समाजवादी नेते दशरथ पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिला.

लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्यावतीने अध्यक्ष दशरथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला नाव देणे तसेच इतर प्रश्नांबाबत विचारविनिमय करण्यासाठी शासकीय विश्रामगृह येथे ठाणे जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन केले होते. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत दशरथ पाटील बोलत होते. बैठकीला माजी मंत्री जगन्नाथ पाटील, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे आणि पदाधिकारी उपस्थित होते. लोकनेते दि. वा पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे यासाठी आजवर अनेक आंदोलने केली. त्यामुळे राज्य सरकारने त्यांच्या नावाचा ठराव महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजूर करून तो केंद्र सरकारकडे पाठविला आहे. परंतु हा ठराव केंद्रात अजूनही प्रलंबित आहे. विमानतळाचे काम आता पूर्णत्वास आले आहे. कदाचित नोव्हेंबर पासून उड्डाणाला सुरुवात होईल. अशावेळी दि. बां.चे नाव या विमानतळाला देणे गरजेचे आहे, असे दशरथ पाटील म्हणाले. केंद्र सरकारच्या हवाई वाहतूक मंत्र्यांबरोबर बैठक घेऊन कृती समितीच्या वतीने या प्रश्नाचा पाठपुरावा केला आहे. तरीही आजपर्यंत हा प्रश्न केंद्रात प्रलंबित असल्याने पकल्पग्रस्तांमध्ये असंतोष पसरला आहे. या असंतोषाचा स्फोट होऊ न देता केंदाने हा प्रश्न त्वरित सोडवावा असे दशरथ पाटील म्हणाले.

# घणसोलीत पाणी साठण्याच्या शक्यतेने बसविला पंप

◆ **नवी मुंबई (प्रतिनिधी) :**



शहरातील अनेक भागात काही तांत्रिक चुकांमुळे पावसाळ्यात पाणी साठले जाते. अशीच परिस्थिती घणसोली येथील साई सदानंद नगर परिसरात मागील सात, आठ वर्षांपासून परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे पावसाचे पाणी थेट घरामध्ये घुसू लागले. यावर प्रतिबंध यावा. म्हणून घणसोली विभाग कार्यालयाच्या अभियांत्रिकी विभागाच्यावतीने आजच्याघडीला जोरदार पाऊस पडत असल्याने तत्परता दाखवत पाणी फेकणारा पंप कार्यान्वित केला आहे. यामुळे रहिवाश्यांनी समाधान व्यक्त केला आहे. साई सदानंद नगर परिसरात चाळी मोठ्या प्रमाणात आहेत. पायवाटसाठी टाकण्यात आलेला सिमेंट काँक्रिट थेट घरांच्या उंबऱ्यापर्यंत पोहचला. त्यामुळे मुसळधार पाऊस आला की, या परिसरात पाणी भरते. त्यामुळे पंपाद्वारे उपसा केला की, पाण्याचे प्रमाण कमी होते. यामुळे अभियांत्रिकी विभागाने पंप बसविला.

# मुरबाडमधील सरळगावात शेवळी, चायवळ दाखल

### बाजारपेठेला मंत्री कपिल पाटील यांनी दिली भेट

◆ **मुरबाड (वार्ताहर) :**

मुरबाड - कल्याण या राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या प्रमुख बाजारपेठ म्हणजे सरळगाव येथे शेवळी व चायवळ बाजारात दाखल झाल्या आहेत. याचवेळी या मार्गाने माजी केंद्रीय पंचायत राजमंत्री कपिल पाटील जात असताना त्यांच्या लक्षात आले की रस्त्याच्या कडेला आदिवासी महिला शेवळी व चायवळ विक्रीसाठी बसल्या आहेत.

हे पाहिल्यानंतर माजी मंत्री कपिल पाटील यांनी आपली गाडी थांबवू खाली उतरले. त्यांनी आदिवासी महिलांची विचारपूस केली. तुम्हाला या शेवळी व चावल विक्रीतून किती पैसे मिळतात, परंतु आदिवासी महिलांनी उत्तर दिले की




मोजकेच पैसे मिळतात. यावेळी माजी मंत्री कपिल पाटील यांनी शेवळी व चायवळ यांच्या तीन जुड्या घेतल्या. परंतु शेवळी १०० रुपयाला चार जुड्या मिळतात, परंतु कपिल पाटील यांनी तीन जुड्या घेतल्या, त्यांना पाचशे रुपये दिले.

यावेळी त्यांच्यासोबत माजी आमदार पांडुरंग बरोरा, जयवंत सुर्यराव , सुभाष हरड, रामभाऊ माळी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. परंतु अशाप्रकारे रानभाज्या विकून उदारनिर्वाह करणाऱ्या आदिवासी महिलांची माजी मंत्री कपिल पाटील यांनी विचारपूस केल्याने सरळगाव नाक्यावर नागरिकांनी आनंद व्यक्त केला. तसेच आदिवासी महिलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आले. आदिवासी महिलांनी कपिल पाटील यांना नमस्कार करून धन्यवाद दिले.

## आयरे गावात अनधिकृत बांधकामावर केडीएमसीची कारवाई

◆ **कल्याण (प्रतिनिधी):**

कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या ग प्रभाग अंतर्गत, आयरे गावात गटार व नाल्याच्या साफसफाईसंदर्भात प्रभागाच्या सहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी निरीक्षण व पाहणी केली. यादरम्यान संबंधित परिसरात अनधिकृत चाळीचे बांधकाम आढळून आले.पाहणीवेळी महापालिकेच्या ग प्रभागाच्या पथकास १५ जोत्यांचे (फाउंडेशन) बांधकाम व ५ पूर्ण झालेल्या खोल्यांचे अनधिकृत बांधकाम निदर्शनास आले. सदर बांधकाम सार्वजनिक गटार व नाल्यावर अतिक्रमण करून करण्यात आले होते, त्यामुळे महापालिकेच्या



ग प्रभागाच्या अतिक्रमण विरोधी पथकाद्वारे त्वरित निष्कासन कारवाई करून हे अनधिकृत बांधकाम पाडून टाकण्यात आले आणि परिसरात स्वच्छता व मोकळेपणा राखण्यात आलेला आहे. महापालिकेने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे की कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम वा अतिक्रमण सहन केले जाणार नाही आणि याविरोधात सातत्याने कठोर पावले उचलली जातील.

## सिव्हिल रुग्णालयात गुढघा शस्त्रक्रिया यशस्वी


**ठाणे :** ठाणे सिव्हिल रुग्णालयात एका २४ वर्षीय तरुणावर गुडघ्याची अवघड शस्त्रक्रिया यशस्वी झाली. कामाच्या ठिकाणी अपघातात ती व्यक्ती गंभीर जखमी झाली होती. तपासणीनंतर अजयच्या गुडघ्याची लिगामेंट तुटली होती. गुढघ्याची लिगामेंट पुन्हा पहिल्यासारखी करणे काहीशी आव्हानात्मक गोष्ट होती. त्यामुळे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली अजयवर दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया करण्यात आली. या शस्त्रक्रियेसाठी अतिरिक जिल्हा शल्य चिकीत्सक अस्थिव्यंग तज्ज्ञ डॉ. धीरज महांगडे, डॉ. मोहन मुराडे, डॉ. दीपेश पाटील, डॉ. प्रियंका महांगडे, डॉ. रुपाली यादव, जागृती गायकर मिलिंद दौंडे, रत्नाकर ठाकरे आदींनी अथक परिश्रम घेतले.

### जिल्हाधिकारी अशोक शिनगरे यांच्याकडून अभियानास हिरवा झेंडा

# शेतकऱ्यांसाठी राबवणार पंधरा दिवसांचा कृषी संकल्प अभियान

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय प्रांगणात २९ मे ते १२ जून या कालावधीत १५ दिवस राबविण्यात येणाऱ्या विकसित कृषी संकल्प अभियानाचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. यावेळी मुंबई पशूवैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेश इंगोले, कृषी विज्ञान केंद्र प्रमुख डॉ.सुरेश जगदाळे, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, तहसीलदार सचिन चौधर, कृषी विज्ञान केंद्राचे



विषय तज्ञ प्रा.डॉ. सलील हांडे व अन्य कर्मचारी उपस्थित होते. या अभियानात मुरबाड, कल्याण, शहापूर,भिवंडी, अंबरनाथ तालुक्यातील अंतर्गत दररोज ६ म्हणजेच एकूण ९० गावांमध्ये माफसूचे शास्त्रज्ञ शेतकऱ्यांच्या तसेच पशुपालकांच्या भेटी घेणार आहेत.

शेतकऱ्यांना, पशुपालकांना त्यांचा पशुसंवर्धन विषयक व्यवसाय वृद्धिंगत करण्यासाठी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाने बनविलेल्या माहिती पुस्तिकेचे अनावरण जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते झाले. या माहिती पुस्तिकेमध्ये गोचीड निर्मूलन, जनावरांचे लसीकरण, यशस्वी दुग्धव्यवसाय शास्त्रोक्त पध्दतीने करण्याबाबत, संकरीत चारा लागवड कशी करावी, सेंद्रीय शेती,शास्त्रोक्त पध्दतीने वासरांचे आहार व्यवस्थापन, लंपी चर्मरोग ग्रस्त जनावरांची करावयाची सुश्रुषा अशा अनेक विषयावर सविस्तर माहिती देण्यात आली आहे.


समृद्ध शेतकरी अभियानामध्ये खरीप पिकांसाठी नवीन तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना देणे, नैसर्गिक शेती पद्धतींना प्रोत्साहन देणे, माती आरोग्य कार्डावर आधारित पीक निवडीचे मार्गदर्शन करणे, खंताचा संतुलित वापर करण्यास प्रोत्साहन देणे,आयसीटी साधने आणि आधुनिक उपकरणांचा वापर करुन स्मार्ट शेतीला प्राधान्य देणे, कृषी ड्रोनचे थेट प्रात्यक्षिक, यंत्रावर आधारित शेतीचे मॉडेल, शेतकऱ्यांच्या नवोपक्रमांना प्रोत्साहन आदी विषयांवर शेतकऱ्यासांठी फायदा होण्यासाठी ही जनजागृती सुरु आहे. तसेच ९० गावांसोबतच महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ संपूर्ण महाराष्ट्रभर सदरील अभियानांतर्गत वेगवेगळ्या जिल्ह्यात सहभागी झाले आहे. मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयातर्फे संपूर्ण कोकण विभाग तसेच नंदुरबार, नाशिक, धुळे जिल्ह्यासाठी एक जिल्हा एक अधिकारी या अंतर्गत प्रतिनिधीची नेमणूक केली आहे. जेणेकरून विद्यापीठांअंतर्गत झालेल्या संशोधनाचा शेतकऱ्यांच्या बांधावर, पशुपालकांच्या गोठ्यापर्यंत प्रसार होईल.

## ‘ठाण्यात स्वातंत्र्यवीर सावरकरांचे स्मारक बांधावे'

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाचे नेते आणि पालघर ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त रोडे यांच्याकडे २८ मे रोजी झालेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त ठाण्यात संग्रहालय रूपी स्मारक उभारण्याची मागणी केली आहे.

सावरकरांचे ऐतिहासिक योगदान आणि विचारधारा भारतीय स्वातंत्र्य चळवळीत अत्यंत महत्त्वाचे होते. त्यांच्या कार्याचा आणि त्यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी या स्मारकाची आवश्यकता आहे. सावरकरांच्या विचारधारेत सामाजिक एकतेचा संदेश आहे, जो आजच्या



काळात अत्यंत आवश्यक आहे. ठाणे हे ऐतिहासिक शहर असून, येथे स्मारक उभारल्यास शहराची सांस्कृतिक ओळख अधिक उज्ज्वल होईल. हे स्मारक ठाण्यातील पर्यटनाला चालना देईल, ज्यामुळे पर्यटकांना सावरकरांची कथा आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीबद्दल माहिती मिळेल. स्मारकाच्या स्थापनेमुळे ठाण्यातील नागरिकांना सावरकरांच्या कार्याची आठवण राहील आणि त्यांचे विचार पुढील पिढ्यांपर्यंत पोहचवता येतील.

या स्मारकाच्या निर्मितीमुळे ठाण्याच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाला एक नवा आयाम मिळेल, असेही जाधव यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी ठाणे शहर अध्यक्ष रवींद्र मोरे, ठाणे जिल्हा सचिव नैनेश पाटणकर, पवन पडवळ, विनायक नलावडे आदी उपस्थित होते.

# परकीय गुंतवणूकदारांचा महाराष्ट्रावर विश्वास!

देशामध्ये महाराष्ट्र राज्य गुंतवणुकीसाठी, शांततेसाठी, उपजीविकेसाठी विश्वसनीय व आशादायक ठिकाण असल्याचे चित्र स्वातंत्र्य मिळाल्यापासून निर्माण झाले आहे, ते आजतागायत कायम आहे. अर्थात देशातील अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील राजकीय वातावरण, सत्ताधारी तसेच विरोधी घटकही प्रगल्भ असल्याने तसेच अन्य राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्रात पायाभूत सुविधाही तसेच कुशल व अकुशल मजूर वर्ग, अधिकारी वर्ग अधिकाधिक प्रमाणावर सहजासहजी उपलब्ध होत असल्याने परकीय गुंतवणूकदारांना भारतात गुंतवणूक करावयाची झाल्यास ते महाराष्ट्राला अधिक पसंती देत असतात. राजकीय स्थिरता हा घटक परकीय गुंतवणूकदारांसाठी महत्त्वाचा भाग ठरत असतो. महाराष्ट्रामध्ये राजकीय स्थिरता नेहमीच राहिलेली आहे. १९७७ मधील पुलोद राजवट व २०१९मधील मविआ सरकारचा अपवाद वगळता अन्य राज्य सरकारांनी आपली पाच वर्षे पूर्ण केलेली आहेत. भारतीय रिझर्व्ह बँकेने नुकतीच देशातील परकीय गुंतवणुकीची राज्यनिहाय आकडेवारी जाहीर केली असून, त्यानुसार महाराष्ट्र देशात अव्वल स्थानी पोहोचला आहे. एकट्या महाराष्ट्रात एकूण गुंतवणुकीच्या तब्बल ४० टक्के परकीय गुंतवणूक झाली असून, ही आकडेवारी राज्यासाठी अभिमानास्पद आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत महाराष्ट्रात २५ हजार ४४१ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक झाली आहे. संपूर्ण आर्थिक वर्षात महाराष्ट्राने एकूण १,६४,८७५ कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. ही गुंतवणूक देशातील एकूण ४,२१,९२९ कोटी रुपयांपैकी ४० टक्के आहे. ही गतवर्षीच्या तुलनेत ३२ टक्के वाढ आहे आणि गेल्या १० वर्षांतील विक्रमी गुंतवणूक आहे. परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र ही गुंतवणूकदारांची पहिली पसंती असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. परकीय गुंतवणुकीत देश पातळीवर महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे. गत आर्थिक वर्षात (जानेवारी ते मार्च २०२५) शेवटच्या तिमाहीत २५,४४१ कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. हे वर्ष महाराष्ट्रासाठी विक्रमी ठरले असून, मागील दहा वर्षांतील सर्वोच्च परकीय गुंतवणुकीचा नवा उच्चांक प्रस्थापित झाला आहे. विशेष म्हणजे, हा उच्चांक आर्थिक वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांतच पार झाला आहे. २०१५-१६ मध्ये महाराष्ट्रामध्ये परकीय गुंतवणूकदारांनी ६१ हजार ४८२ कोटी रुपयांची गुंतवणूक केली होती. २०२४-२५ मध्ये परकीय गुंतवणूकदारांनी थेट एक लाख ६४ हजार ८७५ कोटी रुपयांची केलेली गुंतवणूक पाहता दहा वर्षांच्या कालावधीत १ लाख ३ हजार ३९३ कोटी रुपयांची वाढ झालेली आहे. हे चित्र अशक्य वाटत असले तरी वास्तवदर्शी असून आरबीआयनेच अधिकृतरीत्या ही माहिती दिलेली आहे. महाराष्ट्रात राज्य पावणेदोन लाख कोटींच्या जवळपास गुंतवणूक होत असताना कर्नाटकमध्ये ५६,०३० कोटी, दिल्लीमध्ये ५१,५४० कोटी, गुजरातमध्ये ४७,९४७ कोटी, तमिळनाडूमध्ये ३१,१०३ कोटी, हरियाणामध्ये २६,६०० कोटी, तेलंगणामध्ये २५,३५१ कोटी परकीय गुंतवणूक झालेली आहे. महाराष्ट्राच्या तुलनेत ही गुंतवणूक कमी असल्याने परकीय गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी अन्य राज्ये भगिरथ प्रयत्न करत असले तरी त्यांनी महाराष्ट्रातच गुंतवणुकीला प्राधान्य देताना नकळतपणे महाराष्ट्रावरील विश्वासाला शिक्कामोर्तब केलेले आहे.

महाराष्ट्रातील सत्ताधारी नेतेमंडळी त्यांच्या राजवटीत परकीय गुंतवणुकीदारांना आकर्षित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. या प्रयत्नांना आता मूर्त स्वरूप प्राप्त झाले आहेत. २०१६-१७ मध्ये महाराष्ट्रात १ लाख ३१ हजार ९८० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली होती. त्यानंतर गुंतवणुकीचा आलेख २०१८-१९, २०१९-२०मध्ये घसरला होता. तथापि २०२०-२१ पासून पुन्हा एकवार महाराष्ट्रामध्ये परकीय गुंतवणूकदारांच्या गुंतवणुकीचा ओघ वाढू लागला. गुंतवणुकीचा आकडा १ लाख कोटींच्या पुढे गेला आणि आता तोच आकडा दीड लाख कोटींच्या पुढे गेला आहे. महाराष्ट्रामध्ये शहरीकरणाची प्रक्रिया वेगाने विकसित होत असून ग्रामीण भागाचा चेहरा-मोहरा बदलत आहे. ग्रामीण भागात सुविधांचे वाढते जाळे, राज्य सरकारकडून उद्योजकांना वाढते सहकार्य, कामगारांची मुबलक प्रमाणावर उपलब्धता, चांगले व दर्जेदार रस्ते, कामगार संघटनांचे निरुपद्रवी भूमिका यामुळे अन्य राज्यांच्या तुलनेत देशातील तसेच विदेशातील गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन करण्यात महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे. महाराष्ट्रात सध्या महायुतीचे सरकार आहे. देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र पुन्हा प्रगतिपथावर गरुडभरारी घेऊ लागला आहे. कोरोना काळात महाराष्ट्रातील अर्थकारणातील गती मंदावली होती. एमआयडीसीतील कंपन्या-कारखान्यांना टाळे लागले होते. कोरोना संकट टळताच एमआयडीसी विभाग नव्याने कात टाकून प्रगती करू लागला आहे. कंपन्या-कारखान्यांमध्ये वर्दळ वाढू लागली आहे. आयात कमी व निर्यात जास्त होऊ लागली आहे. अन्य देशातून कच्चा माल मागवून त्याच देशांना पक्का माल विकण्याची हातोटी महाराष्ट्रातील अनेक उद्योजकांना प्राप्त झाली आहे. परकीय गुंतवणूकदारांचा वाढता विश्वास व कंपन्या-कारखान्यांची वाढती संख्या हे चित्र महाराष्ट्रासाठी नक्कीच सुखावह आहे. महाराष्ट्राच्या अर्थकरणामध्ये उद्योग विश्वाचा एकीकडे सहभाग वाढत असताना दुसरीकडे जगामध्ये अर्थकारणात भारत देशही प्रगती करू लागला आहे. भारत आता जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेला चौथ्या क्रमांकाचा देश बनला आहे. भारताची अर्थव्यवस्था आता ४ ट्रिलियन डॉलर्सची झाली आहे. जगभरात सगळीकडे मंदीचे सावट आहे. अनेक देशांमध्ये युद्ध सुरू आहेत. त्याचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होतो आहे. अशा परिस्थितीत भारतीय अर्थव्यवस्था पुढे जात आहे, ही तमाम भारतीयांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला ही नवी ओळख मिळाली आहे. अमेरिका, चीन आणि जर्मन हे तीनच देश सध्या अर्थव्यवस्थेच्या बाबतीत भारताच्या पुढे आहेत. जागतिक अर्थव्यवस्थेच्या शर्यतीत भारताने मोठा टप्पा पार करत इतिहास रचला आहे. भारताने आता जपानला मागे टाकत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून आपले स्थान पक्के केले आहे. नीती आयोगाच्या दहाव्या गव्हर्निंग कौन्सिलच्या बैठकीमध्ये हे स्पष्ट करण्यात आले.

## राशिभविष्य

शनिवार, ३१ मे २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मिती ज्येष्ठ शुद्ध पंचमी शके १९४७, चंद्र नक्षत्र पुष्य, योग बुद्धी, चंद्र राशी कर्क. भारतीय सौर १० ज्येष्ठ शके १९४७ म्हणजेच शनिवार दिनांक ३१ मे २०२५. मुंबईचा सूर्योदय ०६.००, मुंबईचा सूर्यास्त ०७.११, मुंबईचा चंद्रोदय १०.०१, मुंबईचा चंद्रास्त ०३.०७, राहू काळ ०९.१८ ते १०.५७, अहिल्याबाई होळकर जयंती, शुभ दिवस.

### ॥ भविष्य ॥

**मेष** : व्यवसायात भरभराट होईल

**वृषभ** : आर्थिक फायदा होईल.

**मिथुन** : दिवस चांगला आहे.

**कर्क** : आर्थिक परिस्थिती उत्तम राहील.

**सिंह** : कामाचे स्वरूप बदलू शकते.

**कन्या** : प्रवासाचे योग आहेत.

**तूळ** : आनंद आणि उत्साह वाढेल.

**वृश्चिक** : आर्थिक आवक चांगली राहील.

**धनू** : प्रवासाचे योग आहेत.

**मकर** : अडचणी निर्माण होण्याची शक्यता.

**कुंभ** : अनुकूल दिवस आहे.

**मीन** : व्यवसायात चांगली परिस्थिती राहील.

# मला भावलेल्या अहिल्याई



**चित्रा वाघ**

**आमदार, भाजपा**

१७२५ साली जन्मलेल्या अहिल्याईंच्या आयुष्यात किती चढउतार आले. पण मनाने निर्मळ, विचारांनी ठाम आणि प्रामाणिक असलेल्या अहिल्याईंनी सगळं नुसतं निभावून नेलं नाही, तर प्रत्येक क्षेत्रात आदर्श निर्माण केला. धर्माला, रूढी परंपरेच्या कचाट्यातून दूर करण्याचे धारिष्ट त्यांनी दाखवलं. या संस्कारांचं बीज त्यांचे वडील माणकोजी आणि आई सुशीलाबाई शिंदे यांनी रुजवलं होतं. त्या संस्कार रूपी रोपट्याचा विशाल वृक्ष अहिल्याईंचे सासरे बुवा म्हणजेच सुभेदार मल्हारराव होळकर आणि त्यांच्या सासूबाई गौतमाबाई यांनी केला. ज्या काळात महिला चूल मूल आणि समाजाने नेमलेल्या रूढी परंपरेच्या बेड्यांमध्ये जगत होत्या, त्या काळात मल्हारराव अहिल्याईंना "माझा कुळपुत्र अहिल्योबा" म्हणत. त्यांनी अहिल्याईंना तयारही तसंच केलं. अवघ्या तेरा-चौदा वर्षांच्या अहिल्याईंवर सरकारी आणि खासगी दोन्ही हिशेबांची जबाबदारी दिली. ती अहिल्याईंनी निभावून देखील दाखवली होती.

याबाबत एक प्रसंग नमूद करावासा वाटतो. बाजीराव पेशवे आणि मल्हाररावांचे ऋणानुबंध होते. त्यांचं नातं घट्ट होतं. त्यामुळे जेव्हा बाजीराव निवर्तले तेव्हा मल्हाररावांना खूप दुःख झालं होतं. अहिल्याईंसह साऱ्या होळकर कुटुंबीयांनी बाजीराव पेशव्यांच्या स्मरणार्थ अनेक पूजा, अधिष्ठान आणि दानधर्म केले होते. त्याच दरम्यान अहिल्यादेवी दफ्तरी आल्या आणि त्यांनी हिशेब पाहिले, तेव्हा त्यांची तळपायाची आग मस्तकी गेली. कारण या सगळ्या पूजेचा, अधिष्ठान आणि दानधर्मांचा खर्च सरकारी चोपड्यांमध्ये नोंदवला होता. तेव्हा अहिल्याईंनी गंगोबा तात्यांना खडसावून सांगितलं की, सासरेबुवा आणि श्रीमंत बाजीराव पेशव्यांचे नाते हे खासगी होते. जे दुःख झालं ते होळकर कुटुंबीयांना झालं. त्यामुळेच हे सगळे विधी होळकरांच्या खासगीत नोंदवा. इतक्या लहान वयातला हा प्रामाणिकपणा आणि समज पाहून सगळेच धन्य झाले होते. अहिल्याई शास्त्र आणि शस्त्र या दोघांचं शिक्षण घेत स्वतःला सिद्ध करत गेल्या. अर्थशास्त्र, न्यायदान आणि राज्यकारभार यातील त्यांची समज अद्वितिय होती.

पुढे कुंभेरीच्या लढाईत खंडेराव मृत्युमुखी पडले तेव्हा फक्त अहिल्याईंवर नाही तर संपूर्ण राज्यावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. अहिल्याई सती जाणार की काय या विचारांनी मल्हारराव व्याकुळ झाले होते. त्यांनी आणि गौतमाबाईंनी अहिल्याईंना सती जाण्यापासून परावृत्त केलं, ते मावळातल्या प्रजेसाठी मातोश्री हो म्हणून विनवणी केली. तेव्हा अहिल्याईंनी आपल्या गुरू आणि पित्यासमान मल्हाररावांचा शब्द मोडू दिला नाही. पुढे त्यांनी एका हाती शास्त्र आणि एका हाती शस्त्र घेऊन राज्य कारभार सांभाळला. त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात दुःखाचे डोंगर कोसळले होते. स्वकीय असो वा परकीय आक्रमणं झाली पण त्या कधी डगमगल्या नाहीत. अहिल्याईंनी संपूर्ण आयुष्य शिव आराधना, न्याय आणि प्रजेच्या हिताचं राजकारण यासाठी समर्पित केलं.

त्यांच्यासमोर मुघल, इंग्रज, डच यांच्याशिवाय काही स्वकीय शत्रूंचे आव्हान होते. चहुबाजूंनी आक्रमणं होत होती. कित्येक गावं ओसाड पडत होती पण अहिल्याईंनी ती गावं पुन्हा वसवली. राज्यातल्या शेती आणि शेतकऱ्यांना प्राधान्य दिलं. गरीब शेतकऱ्यांना कसायला जमिनी दिल्या. नौ-ग्यारा कानून केला. शेतकऱ्यांनी फळझाडांची लागवड करायची, त्यातील नऊ झाडं त्यांच्या चरितार्थासाठी ठेवायची आणि अकरा झाडांचं उत्पन्न सरकार दरबारी जमा करायचं, असा हा नौ-ग्यारा कानून होता. त्याचबरोबर त्यांनी जल-जंगल जमीन यासोबत पाळीव-वन्य प्राणी, जलचर, पक्षी या सर्वांना महत्त्व दिलं.

अहिल्याईंनी त्याकाळी ज्या पद्धतीने पाणी व्यवस्थापन केलं त्याबाबत त्यांचा हात कोणीच पकडू शकत नाही. वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून कित्येक ठिकाणी बंधारे, नद्यांवर घाट, विहिरी, बावड्या, तलाव बांधले. यामध्ये संपूर्ण निसर्गाचा विचार त्यांनी केला. त्यामुळेच ज्यावेळी संपूर्ण हिंदुस्थानात दुष्काळ पडला होता, त्यावेळी मावळ पाचूसारखा चमकत होता असे म्हणायचे.

जनजाती संरक्षण ही संकल्पना त्याकाळी अहिल्याईंनी राबवली होती. जेव्हा विंध्य सातपुड्यातील निमाड गाव अहिल्याईंच्या अधिपत्याखाली आलं होतं तेव्हा या भागात भिल्लांचा प्रचंड उपद्रव होता. व्यापारी असो किंवा सामान्य प्रवासी या भागातून प्रवास करायला घाबरायचे. कारण भिल्लांचा व्यवसाय म्हणजेच लुटमार होती. पण अहिल्याईंनी त्यांची मानसिकता ओळखली, तिथल्या परिस्थितीचा अभ्यास केला आणि मग भिल्लांना कसायला जमिनी दिल्या. शेतीचं प्रशिक्षण दिलं. त्यांना समाजाचा घटक बनवलं. भिल्लांनाच प्रवाशांच्या सुरक्षतेची जबाबदारी दिली. इथला उपद्रव समूळ नष्ट व्हावा म्हणून त्यांनी दरबारी विडाच ठेवला होता की, जो कोणी हा उपद्रव समूळ नष्ट करेल त्याच्या हाती माझ्या लेकीचा म्हणजे मुक्तेचा हात देईल किती मोठा धाडसी निर्णय होता हा पण अहिल्याईंनी प्रजेसाठी तो घेतला.

खरंतर त्यांचं कार्य असं कमी शब्दांत मांडता येण्यासारखं नाहीच. पण मला अहिल्याईंची सर्वात भावलेली गोष्ट म्हणजे त्या प्रचंड ताकदवान होत्या. याचं एक उदाहरण द्यायचं झालं तर तर, एकदा होळकरांची फौज पेशव्यांसोबत निजामाशी लढत होती त्यातल्या एका तुकडीने अहिल्याईंना संदेश पाठवला की, हैद्राबादेपासून आत साधारण १२० किलोमीटर अंतरावर एक प्राचीन शिवमंदिर आहे. त्या मंदिराची पडझड झाली आहे. अहिल्याईंनी लागलीच निजामाला खलीता धाडला. त्यांनी त्यात लिहिलं की, राजमुंदरामधील शिवमंदिर प्राचीन आहे. तिथल्या शिवशंभूंची सेवा करणे, तसेच रयतेसाठी येण्या-जाण्याची व्यवस्था करणे हा आमचा धर्म आहे. त्यामुळे आम्ही इथून तिथल्या मंदिराच्या व्यवस्थेसाठी पैसे आणि कामगार, माणसे पाठवते. तुम्ही फक्त आम्हाला कामाची परवानगी द्या. या पत्रावर निजामानं काय उत्तर पाठवलं माहितेय? त्याने लिहलं की, आप हमारी बड़ी आपा हो. म्हणजे तुम्ही मला मोठ्या बहिणीसारख्या आहात. तुम्ही इथली काळजी करू नका. मी स्वखर्चाने मंदिराचा जीर्णोद्धार करतो. त्याला तुमचं नाव देतो. रयतेची देखील व्यवस्था पाहतो. तुम्ही कुठलीच तसदी घेऊ नका.

यावरून आपल्या लक्षात येईल की अहिल्याईंचे शासन सर्वत्र नसलं तरी संपूर्ण हिंदुस्तानात त्यांना मान्यता होती. त्यांच्याबद्दल रयतेच्या मनात जिव्हाळा आणि यवनी शासकांच्या मनात भीती होती. शासकांवर अहिल्याईंचा वचक होता.

त्या एक मुसद्दी राजकारणी होत्या, रणांगणात रणरागिणी होत्या. न्याय आणि शिस्तप्रिय होत्या. धर्मरक्षक होत्या. विशेष म्हणजे त्या एक स्त्री होत्या आणि प्रजेच्या मनात मातेचं स्वरुप होत्या. हे सगळं होणं खरंच सोप्प नाही. म्हणूनच त्यांना पुण्यश्लोक ही उपाधी देण्यात आली. ही उपाधी कोणा राजा महाराजा किंवा पेशव्यांनी नाही दिली प्रजेने सुद्धा दिली नाही. ही उपाधी त्यांना त्या काळच्या संत महात्मा आणि ऋषी होते. त्यांनी दिली. अजून महत्त्वाची गोष्ट अशी ही उपाधी जगामध्ये फक्त चार जणांना मिळाली आहे. एक म्हणजे पांडवांमधला राजा युधिष्ठिर, त्यानंतर राजा नल आणि खुद्द भगवान विष्णू यांना त्यानंतर आपल्या अहिल्याईंना... म्हणूनच त्यांना अहिल्यादेवी म्हणायचे. आहिल्याईंच्या आठवणींचा नेहमीच जागर व्हायला हवा...

**अहिल्याबाई होळकर यांची ३१ मे २०२५ रोजी ३०० वी जयंती आहे. याच निमित्ताने त्यांचे कार्य आणि विचारावर आधारित विशेष लेख!**



# एका आदर्श महिला नेतृत्वाला वंदन!

**वर्षा फडके-आंधळे**

**उपसंचालक (वृत्त), माहिती व जनसंपर्क संचालनालय**

भारतीय इतिहासात मोठी युद्धे झाली, साम्राज्ये उभी राहिली आणि कोसळली. परंतु, या साऱ्या घडामोडींमध्ये ज्या व्यक्तींनी आपल्या कार्याने समाजहित, धर्मरक्षण आणि जनकल्याण या मूल्यांना सर्वोच्च मान दिला, त्यात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे स्थान अग्रभागी आहे. त्यांच्या जीवनकार्याने सिद्ध केलं की एका स्त्रीचं नेतृत्व केवळ राजसिंहासनापुरतं मर्यादित राहत नाही, तर ते समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचू शकतं. अहिल्याबाई होळकर या केवळ इंदूरच्या होळकर घराण्याच्या राणी नव्हत्या तर त्या एक द्रष्ट्या प्रशासक, न्यायप्रिय नेत्या, धर्मपरायण समाजसुधारक आणि स्त्री सक्षमीकरणाच्या आद्य पुरस्कर्त्या होत्या. त्यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त, त्यांचे स्मरण त्यांच्या विचारांमधून नव्याने प्रेरणा घेण्याचे निमित्त आहे!

**प्रशासन, सामाजिक कार्यात अग्रेसर**

अहिल्याबाई होळकर यांचे नेतृत्व केवळ राज्यकारभारापुरते मर्यादित नव्हते, तर त्यात धर्म, न्याय, लोकसेवा आणि नीतीमूल्यांचे सखोल अधिष्ठान होते. त्यांनी महेश्वरला आपली राजधानी बनवली. ही राजधानी एक आदर्श प्रशासनाचे प्रमाण होते. अहिल्याबाई दररोज प्रजेसोबत संवाद साधत. हे त्यांचे कार्य आजच्या लोकशाही व्यवस्थेलाही मार्गदर्शक ठरावे असेच आहे. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य धार्मिक स्थळांचे पुनरुज्जीवन आणि समाजकल्याण यासाठी वाहिले. काशी विश्वनाथ, गंगाघाट, रामेश्वरम, सोमनाथ, द्वारका अशा अनेक प्राचीन आणि पवित्र स्थळांचे जीर्णोद्धार करून त्यांनी भारतीय सांस्कृतिक एकात्मतेचे धागे पुन्हा मजबूत केले. त्यांच्या या पुढाकारामुळे हजारो लोकांना निवारा, अन्न आणि आधार मिळाला. त्यांचे हे सामाजिक कार्य आजही संपूर्ण भारतात "लोककल्याणकारी राज्यशासनाचा" आदर्श नमुना मानले जाते. प्रशासन आणि समाजकारण यांचा असा सुरेख मिलाफ क्वचितच इतिहासात पाहायला मिळतो. त्याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर!

**स्त्री सक्षमीकरणाचे आदर्श!**

अठराव्या शतकातील भारतात स्त्रियांना घराच्या चार भिंतींपलीकडे जाण्याची मुभा नव्हती. पण अशा काळातही अहिल्याबाई होळकर यांनी स्त्रिया आत्मनिर्भर बनाव्या यासाठी पुढाकार घेतला. त्या काळात त्यांनी सुरू केलेला महेश्वरी साडी उद्योग केवळ व्यवसाय नव्हता तर तो एक सामाजिक क्रांतीचा भाग होता. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांनी काशी आणि इतर ठिकाणांहून कुशल विणकरांना महेश्वरला बोलावले. त्यांनी स्थानिक महिलांना हातमाग प्रशिक्षण दिले, आणि महिलांना घरोघरी बसून उत्पन्न मिळवण्याची संधी निर्माण केली. १३ ऑगस्ट १७९५ रोजी या महान राणीने देहत्याग केला. धर्मशाळा, भजनमंडळे, सार्वजनिक पाणवठे आणि शिक्षणाच्या सुविधा त्यांनी महिलांसाठी खुल्या केल्या. त्या काळात जेव्हा स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान होते, तेव्हा त्यांनी महिलांना धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक निर्णयांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याची मुभा दिली. भारत सरकारने त्यांच्या स्मृतींना वंदन म्हणून टपाल तिकीट प्रकाशित करून त्यांच्या कार्याला उजाळा दिला आहे. इ.स. १७६७ साली त्यांनी महेश्वर येथे हातमाग उद्योग सुरू करून एक स्थायिक, गुणवत्ताधिष्ठित आणि बाजारपेठेचा विचार करणारा स्थानिक उद्योग उभारला. यामागील हेतू होता तो स्त्रियांना उपजीविकेचा मार्ग उपलब्ध करून देणे आणि महेश्वरला धार्मिक व पारंपरिक वस्त्रकलेचे केंद्र बनवणे. महेश्वरी साडी आणि अहिल्याबाई यांचे नाते केवळ वस्त्रनिर्मितीपुरते मर्यादित नाही, तर ते महिला सक्षमीकरण, सांस्कृतिक वारसा आणि स्थानिक उद्योगाचा उत्कर्ष यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे.

**महेश्वरी साड्यांची क्रेझ आजही कायम!**

महेश्वरी साड्या हलक्या आणि देखण्या सूती किंवा सिल्क-कॉटन मिश्र धाग्यांपासून तयार होतात, त्यामुळे साडी नेसण्यास हलकी. साड्यांची किनारी(जरी पट्टा) अतिशय आकर्षक आणि पारंपरिक नक्षीकामाने सजलेली असते. "रिव्हर्सिबल बॉर्डर" म्हणजेच दोन्ही बाजूंनी वापरता येणारी साडी ही वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट आहे. भारतातच नाही तर विदेशात ही प्रसिद्ध हस्तकला आणि महिला उपयोजनता याचे प्रतीक... अहिल्याबाईंनी त्याकाळी फक्त उद्योग उभारला नाही, तर महिलांना कामात समाविष्ट करून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र बनवले. आजही महेश्वर येथील अनेक महिलांचे कुटुंब महेश्वरी साड्या विणण्यावर आधारित आहे.

**महिला उद्योजिकांसाठी प्रेरणास्त्रोत!**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची त्रिशतकी जन्मजयंती साजरी करताना त्यांच्या दूरदृष्टीने घडवलेल्या उपक्रमांचा आजच्या काळातही प्रभाव दिसतो. महेश्वरी साडी उद्योग हे त्याचे अत्यंत प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांनी स्थापलेला हा स्थानिक उद्योग आजही महिला सक्षमीकरणाचा आदर्श मॉडेल मानला जातो. अहिल्याबाईंच्या कार्यातून मिळणारा मूलभूत धडा म्हणजे, कोणताही व्यवसाय फक्त नफा मिळवण्यासाठी नसावा, तर तो समाजातील दुर्बल घटकांना सक्षम करण्याचे साधन असावे. त्यांची ही दूरदृष्टी आजच्या स्टार्टअप महिला उद्योजिकांसाठी मार्गदर्शक ठरते. आज महेश्वरी साडी जगभरात प्रसिद्ध आहे, पण तिच्या प्रत्येक धाग्यामागे पुण्यश्लोक अहिल्याबाईंचे स्वप्न, दूरदृष्टी आणि स्त्रीच्या सन्मानासाठी दिलेले योगदान विणलेले आहे.

या ऐतिहासिक वारशाला आदरांजली वाहत, राज्य सरकारने ७ मे २०२५ रोजी अहिल्याबाईंच्या जन्मस्थळी, चोंडी (जि. अहमदनगर) येथे पार पडलेल्या विशेष मंत्रिमंडळ बैठकीत महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी "आदिशक्ती अभियान" राबविण्याचा निर्णय घेतला. या अभियानाचा उद्देश म्हणजे महिलांना आरोग्य, पोषण, शिक्षण, आर्थिक सबलीकरण, सामाजिक सहभाग आणि नेतृत्व विकासाच्या माध्यमातून सशक्त करणे आहे. तसेच बालमृत्यू व मातामृत्यू कमी करणे, महिलांचा पंचायतराजमध्ये सहभाग वाढवणे, बालविवाह व कौटुंबिक हिंसाचारास प्रतिबंध करणे, अशा अनेक महत्त्वपूर्ण बाबी यामध्ये समाविष्ट आहेत.

या अभियानाचे मूळ बीज पुण्यश्लोक अहिल्याबाईंच्या विचारांमध्येच आहे – स्त्री ही केवळ कुटुंबाचा आधार नसून, ती समाजाच्या पुनर्बांधणीची शक्ती आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राबवले जाणारे 'आदिशक्ती अभियान' हे स्त्रीसन्मान, स्त्रीसशक्तीकरण आणि सामाजिक परिवर्तनाचे आधुनिक रूप आहे.

# मान्सूनपूर्व पावसामुळे शेतीची कामे खोळंबली...





**रवींद्र तांबे**

मागील आठ ते दहा वर्षांमध्ये आपल्या राज्यात जून महिना संपत आला तरी पुरेसा पाऊस पडला नव्हता. त्यामुळे बऱ्याच वेळा शेतकरी राजाला दुबारा पेरणी करावी लागली होती. यात अनेक शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागले होते. यावेळी अगदी मे महिन्याच्या प्रारंभापासून पावसाने सुरुवात केली आहे. त्यामुळे शेतकरी राजा चिंतेत दिसत आहे. शेतीची कामे सोडा. हातातोंडाला आलेल्या पिकाला सुद्धा शेतकऱ्यांना वंचित व्हावे लागणार आहे. तसेच कोपऱ्यात साठलेल्या पाण्यामुळे पिकलेली पिके कुजणार आहेत. याचा परिणाम शेतकरी दादांच्या उत्पादनात घट होणार हे मात्र नक्की. मग संसार चालणार कसा...! तेव्हा मान्सूनपूर्व पावसामुळे शेतीची कामे खोळंबली असली तरी शेतात पाणी साचल्यामुळे उन्हाळ्यात पिकलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मागील आठवड्यात कोकण रेल्वेने मुंबईला येताना बऱ्याच ठिकाणी पिकलेले भात वाफ्यात पाणी साचल्यामुळे पाण्यात तरंगताना दिसत होते. काही वाफ्यात भात कापून पसरून ठेवले होते. तेव्हा अशा भाताला कोंब येणार. म्हणजे शेतकरी दादांची उन्हाळी मेहनत पूर्ण पाण्यात जाणार आहे. अशा शेतकऱ्यांना ताबडतोब नुकसानभरपाई मिळायला हवी. त्यासाठी ज्या शेतकऱ्यांचे पावसामुळे नैसर्गिक नुकसान झाले असेल त्यांचे पंचनामे करून योग्यती कारवाई शासन पातळीवर होणे गरजेचे आहे. म्हणजे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई मिळाल्यामुळे पुढील शेतीची कामे करणे सोयीचे होईल. यासाठी शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी अर्थात शेतकरी ओळख क्रमांक शासनमान्य असायला हवा. तरच त्यांना शासकीय विविध योजना व अनुदानाचा लाभ घेता येणार आहे. जर शेतकऱ्यांनी फार्मर आयडी बनवले नसेल तर आपल्या जिल्ह्यातील नागरी सुविधा केंद्रावर तयार करून घ्यावे.

सध्याच्या बदलत्या हवामानाचा विचार करता शेतकऱ्यांचे सर्वात जास्त नुकसान होत आहे. ही परिस्थिती शेतीप्रधान देशाला पोषक नाही. उन्हाळ्यामधील मे महिना म्हणजे शेतकऱ्यांच्या शेतीच्या मशागतीचा काळ. जमिनीची मशागत करण्यापूर्वी शेत जमिनीत पाणीच पाणी. मग मशागतच झाली नाही, मग सांगा पेरणी कशी करणार. त्याचप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाच्या वतीने शेतकरी चिंतेत असू नये म्हणून विविध माध्यमांच्या माध्यमातून बातम्या प्रसारित करण्यात येत आहेत.

कोकण विभागातील सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विचार करता सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कृषी विभागाच्या वतीने सन २०२५-२६ या खरीप हंगामासाठी जिल्हा व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये कृषी निविष्ठा उपलब्धता व तक्रार निवारण कक्ष व भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. कृषी निविष्ठाची गुणवत्ता, शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निराकरण व योग्य मार्गदर्शन करण्यात येणार आहे. असे जर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात झाले तर शेतकरी राजाला अधिक बळ येईल.


महत्त्वाची बाब म्हणजे, शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये. पुढील दोन आठवड्याने हवामान कोरडे होण्याची शक्यता आहे असे आवाहन राज्यातील कृषी विभागाने शेतकरी बांधवांना केले आहे. यात कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना जास्त धोका आहे. जर पेरणी केली तर राज्यातील हवामान विभागाच्या अंदाजाप्रमाणे ५ जून नंतर मान्सून थांबल्यास दुबारा पेरणी करण्याची नामुष्की शेतकऱ्यांवर येईल. यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे असे वाटत असले तरी कोरडवाहू जमीन सोडून नदी नदीकाठच्या ज्या शेतजमिनी आहेत तेथे भाताची पेरणी करायला काहीच हरकत नाही त्यासाठी प्रथम लागवड करून नंतर पेरणी करावी. त्यासाठी कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतल्यास अधिक उत्तम होईल.

कोकणातील शेतकऱ्यांच्या मते, एकदा जमीन थंड झाली की, पेरणी करून सुद्धा भात रुजून येत नाही. पाऊस पडल्या पडल्यास पेरणी केल्यास पेरलेले भात रुजून येते. मात्र नंतर पावसाने पाठ फिरवता कामा नये. यासाठी मशागत महत्त्वाची असते असे सांगायला विसरत नाहीत. हा आहे अनुभव. बऱ्याच वेळा शेतीसाठी अनुभव उपयोगाचा असतो. तेव्हा मे महिन्याचा विचार करता पावसाचे लवकर आगमन झाल्याने शेतीच्या दृष्टिकोनातून कृषी विभागाचा सल्ला घेणे शेतकऱ्यांना जास्त हिताचे ठरणार आहे. जर नैसर्गिक आपत्ती आल्यास शासनच आर्थिक मदत करणार आहे. कायद्याचा विचार करता शासकीय स्तरावरील मार्गदर्शन लाभदायक ठरेल. तेव्हा केव्हाही पुस्तकी ज्ञान अधिक मार्गदर्शक ठरते. असे असले तरी आता जरी कृषी विभागाने राज्यातील शेतकऱ्यांना सबुरीचा सल्ला दिला तरी अंदाजे मान्सूनचे आगमन या वर्षी लवकर होण्याची शक्यता आहे असे जरी वर्तविले असते तर शेतकऱ्यांनी आपली लागवडीची कामे लवकर करून घेतली असती. तेव्हा राज्यातील कृषी तसेच हवामान विभागाने सतर्क राहाणे योग्य आहे. कारण शेती हाच भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे हे विसरून चालणार नाही.

तेव्हा या वर्षी शेतकऱ्यांच्या ध्यानीमनी नसताना सुद्धा लवकर पावसाने हजेरी लावली मात्र कालपासून थोडी विश्रांती घेतल्यासारखी वाटत आहे. याचा परिणाम राज्यात अनेक ठिकाणी नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही ठिकाणी गावांचा सुद्धा संपर्क तुटला आहे. आता मान्सूनपूर्व पावसामुळे शेतीची कामे खोळंबल्यामुळे शेतकरी राजाची चिंता वाढली आहे. यासाठी शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत जरी जाहीर केली तरी झालेले नुकसान भरून येणार नाही. तेव्हा राज्यातील शेतकऱ्यांच्या भविष्याचा विचार करता कृषी व हवामान विभागाने वेळच्या वेळी शेतकऱ्यांना सूचना तसेच सल्ला देणे राज्याच्या हिताचे ठरेल. म्हणजे राज्यातील शेतकऱ्यांनी आपली कामे वेळच्या वेळी केल्यास शेतीची कामे खोळंबणार नाहीत.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त...

नेहमीचे आयुष्य जगता जगता, आपले जीवनमान सुधारण्यासाठी आपल्याला पर्यावरणाचे संरक्षण करणे हे अत्यंत गरजेचे झाले आहे. त्यामुळे हवा, पाणी, अन्न आणि इतर गरजांसाठी आपण पर्यावरणावर आणि पर्यायाने स्वतःचे आरोग्यही त्यावर अवलंबून असते. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.



# आपलं पर्यावरण

विशेष
मृणालिनी कुलकर्णी



"काही दिल्याशिवाय, काही घेऊ नये" या निसर्गनियमानुसार आपण पर्यावरणाला काय देतो? पर्यावरण : आपल्या सभोवतालचे वातावरण, जे जैविक आणि अजैविक घटकांनी भरलेले आहे. अठराव्या शतकातील औद्योगिक क्रांतीनंतर, विकासात्मक प्रकल्पामुळे आणि फक्त स्वतःपुरते पाहणे या माणसाच्या वृत्तीमुळे मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास झाला. या माणसाच्या कृतीमुळे पर्यावरणात होत गेलेले बदल, त्यातून निर्माण झालेल्या गंभीर समस्यांकडे (ग्लोबल वॉर्मिंग, हवामान बदल) साऱ्या जगाचे लक्ष वेधले गेले.

१९७२ मध्ये स्टॉकहोम (स्वीडन) येथे मानवी पर्यावरणीय प्रश्नासंबंधी परिषद भरली. अंदाजे १५० देशांचा सहभाग होता. तेथे पर्यावरणीय समस्यांवर विचार करून संयुक्त राष्ट्राच्या महासभेने '५ जून हा दिवस जागतिक पर्यावरणीय दिन' साजरा करण्याचे ठरविले. त्या मागचा उद्देश, जागतिक व्यासपीठाद्वारे पर्यावरणीय समस्या जाणून सर्व स्तरावर जनजागृती करणे, यातून पर्यावरणाचे रक्षण, संवर्धन होऊन सुधारणा होईल.

इतर सर्व दिनापेक्षा ५ जून हा पर्यावरण दिवस महत्त्वाचा. कारण या पर्यावरणात आपण राहतो. हवा, पाणी, अन्न आणि इतर गरजांसाठी आपण पर्यावरणावर, पर्यायाने स्वतःचे आरोग्यही त्यावर अवलंबून आहे. हाच पर्यावरण आणि माणसाच्या अस्तित्वाचा परस्पर संबंध! म्हणून ते आपलं पर्यावरण!

२०२५ च्या पर्यावरणाची थीम "प्लास्टिक प्रदूषण समाप्त करा "! जुलै २००५ साली जलमय झालेल्या परिस्थितीस प्लास्टिकचा कचरा हेच कारण होते. अनुभवाने काही न शिकता आज २० वर्षांनेही त्याचे प्रमाण कमी न होता, आजच्या पावसातही सर्वत्र तेच पाहतोय. पर्यावरणाचा समतोल ढासळण्यासाठी, कार्बन घटकाबरोबरच विखुरलेल्या प्लास्टिकच्या पिशव्याही आहेत. सहज गंमत म्हणून रोजच्या पाच मिनिटांच्या वाटेत, रस्त्यांत, समुद्र किनारी दिसणारे प्लास्टिक मोजा. हे पूर्णतः मानवनिर्मित प्रदूषण आहे. या प्लास्टिक पिशव्यांवर बंदी हवी. घरातही खाण्यासाठी सुद्धा प्लास्टिकच्या वस्तूंचा वापर किती केला जातो. प्लास्टिक पृथ्वीचा भक्षक आहे. त्याचा वापर टाळा.

बाली येथे दहा आणि बारा वर्षांच्या बहिणीने प्लास्टिकच्या विरोधात जनजागृतीसाठी कार्यशाळा घेतल्या, उपोषण केले, 'बाय बाय प्लास्टिक बॅग्स' या संस्थेची स्थापना केली. शेवटी प्लास्टिक कचऱ्याच्या विरोधात कायदा झाला आणि आज बाली देश मोकळा श्वास घेत आहे.

निसर्गातील पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी ही बहुतांशी सामूहिक आहे. पर्यावरण दक्षता मंडळाने त्याच्या रौप्य महोत्सवी वर्षात २०२४ मध्ये 'आपलं पर्यावरण' ही दिनदर्शिका (कॅलेंडर) काढली. त्यात भारतातील प्रमुख पर्यावरणीय चळवळीचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्या आधारे ही खालील माहिती. - १. मारवाड प्रांतात १४८५ मध्ये भयंकर दुष्काळ पडल्याने जनता तो प्रांत सोडून जाऊ लागली. त्यावेळी संत जाम्भोजी गुरूने नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करण्याचे मार्गदर्शन केले. सर्वांना एकत्र आणून 'बिष्णोई' पंथाची स्थापना केली. यातून भारतातील पर्यावरणीय चळवळीला सुरुवात झाली.

११ सप्टेंबर १७३० मध्ये राजस्थानमधील खेजर्ली गावात बिष्णोई पंथातील लोकांनी बहुउपयोगी झाडांची जोपासना केली होती. घरातील कर्त्या पुरुषांना कामासाठी बाहेर काढून झाडे तोडायला कंत्राटदार आले. त्यावेळी अमृतादेवी ही बिष्णोई झाडाला बिलगली. "माझं डोकं उडविल्याने एक जरी झाड वाचलं तर माझं जीवन कृतार्थ ठरेल." सैनिकांनी तिचा शिरच्छेद करताच तिच्या तीन मुलींनंतर इतर महिला अशा एकूण ३६३ बिष्णोईंनी झाड वाचविण्यासाठी आपले बलिदान दिले. हा पर्यावरणीय चळवळीचा दीपस्तंभ होय.

२. वरीलप्रमाणेच १९७३ साली अलकनंदा खोऱ्यातील मंडळ गावातील जंगलाचे लाकूड क्रीडा साहित्यासाठी आणि शेतीची अवजारे करण्यासाठी परवानगी नाकारण्यात आली म्हणून ते जंगल खासगी कंपनीला देऊ केले. वरीलप्रमाणे पुरुष वर्गाला कामानिमित्ताने बाहेर काढले. येथेही गावातील महिलांनी झाडाला मिठी मारली. हेच "चिपको आंदोलन"! यावेळी झाड तोडायला आलेले कंत्राटी निघून गेले.

३. केरळ राज्यातील निरव शांतता असलेली जैवविविधतेसाठी प्रसिद्ध असलेले जंगल 'सायलेंट व्हॅली'. १९७०-७३ साली जनतेकडून आणि सलीम अली अशा दिग्गजांमुळे तेथे प्रकल्प न होता राष्ट्रीय उद्यान केले गेले.

४. झारखंड या शब्दाचा अर्थच जंगलाची जागा! या जंगलात अनेक आदिवासी कुटुंबे राहतात. त्याच्या प्रयत्नाने झारखंड हे नवीन राज्य निर्माण केले गेले. त्याआधी ८० व्या दशकांत हे नैसर्गिक 'साल'चे जंगल तोडून सागवानाची लागवड करण्याच्या निर्णयाला स्थानिक लोकांच्या विरोधामुळे (चळवळीमुळे) झारखंडचे नैसर्गिक जंगल वाचले.

५. जैवविविधतेसाठीच प्रसिद्ध असलेला महाराष्ट्र पश्चिम घाट हे सामाजिक आणि पर्यावरणीय कार्यकर्त्यांच्या आंदोलकांनी वाचविले.

६. नागालँड येथील 'अमूर फाल्कन' हा अतिशय वेगाने प्रवास करणारा सुंदर पक्षी. या पक्ष्याची मांसासाठी होणारी कत्तल, वन्यजीव संरक्षण कायद्याखाली आणि एनजीओच्या माध्यमातून थांबली. नंतर तेथील भक्षकच रक्षक झाले.

७. दिल्लीतील वाढते वायू प्रदूषण - नागरिकांची निदर्शने, मेणबत्ती रॅली, लोकांना मास्क वाटले... आजही तो लढा चालू आहे.

८. जल साक्षरता अंतर्गत स्थानिक जलस्रोत, नैसर्गिक स्थितीला तलाव, खाडी, स्वच्छ ठेवण्याचे अभियान चालू असते. ठाणे येथे फ्लेमिंगोसाठी जागा राखीव ठेवली आहे.

पर्यावणाचे असंतुलन मानवाकडून झाले. तसेच पर्यावरणाचे रक्षणही मानवाच्या सहभागातून होत आहे. त्याची ही वरील उदाहरणे. रोजच्या जीवनात पर्यावरणाच्या रक्षणासाठी आणि संवर्धनासाठी प्रथमतः स्वतःचा परिसर समजून घ्या. आपल्या परिसरातील तलाव, जंगल, बाग, खारफुटी, समुद्र किनारा, पक्ष्यांचे स्थलांतर, (शिवडी) यांना भेट द्या.

गेल्या वर्षी ५ जूनला एका कॉलेजच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जलीय परिस्थितीची, पाण्यातील प्रदूषित घटकांची माहिती होण्यासाठी मुंबईतील पवई तलावाला नेले होते. तलावाच्या सभोवताली एका बाजूला उच्चभ्रू हिरानंदानी वसाहत, दुसरीकडे उद्योग, व्यवसाय करणाऱ्या इमारती, एका बाजूला झोपडपट्टी, एका कोपऱ्यांत नागरिकांनी टाकलेला कचरा, स्वच्छतेसाठी प्रयत्न आवश्यक आहेत हे प्रत्यक्ष बोटीतून फेरी मारल्याने कळले. पाण्याचा रंग, पाण्याची खोली, या सर्वांचा मासे, मगरींवर होत असलेला परिणाम हे सारे अनुभवले.

स्थानिक झाडे लावा. एक झाड अनेक सजीवांचा अधिवास असतो. पर्यावरण पूरक, नैसर्गिक वस्तूंचा वापर करा. ऋतुमानानुसार भाज्या, फळे खावीत. आमच्या भक्तीपार्कमधील रवींद्र संपत हे बागेत झाडाच्या पडलेल्या बिया गोळा करून नियमितपणे झाडे लावतात. अलीकडेच त्यांनी ५० झाडे लावलेली मी स्वतः पाहिली. थोडक्यात सतत जे जे शक्य असेल, ते ते करा नि, पर्यावरणाचे रक्षण करा. प्लास्टिकच्या पिशव्यांचा, पाण्याचा, विजेचा होणारा अमर्याद वापर आपण कमी करू शकतो.

आपलं पर्यावरण वाचविण्यासाठी अनेकजण कार्यरत आहेत. नाशिकमधील शेखर गायकवाड यांनी कुटुंबीयांसह फाशीच्या डोंगरावरील देवराईत अकरा लाख झाडे लावली. याउलट निसर्गाच्या सान्निध्यात मौजमजा करताना दारूच्या बाटल्या, सिगारेट्सची पाकिटे पाहतो, तेव्हा वाईट वाटते. याचा वन्य अधिवासावर परिणाम होत असतो.



आपण परदेशात चेरी ब्लॉसम बघायला कौतुकाने जातो. झाडे तोडल्यामुळे आपल्याकडील वसंत ऋतूची फक्त चाहूल आपण पाहतो. पूर्वी देवराई सुरक्षित ठेवली जायची. जपानमध्ये मियावाकी संकल्पना आहे. पर्यावरण संवर्धनातून व्यवसाय निर्मितीही करू शकतो. या गोष्टीचे महत्त्व पीतांबरीने ओळखून २०१३ साली राजापूर, दापोली येथे सर्व प्रकारची फळ-फुलझाडे, जंगली रोपांच्या नर्सरीची निर्मिती केली. त्याही पुढे मानव निर्मित जंगलेही उभारली. असो.

नेहमीचे आयुष्य जगता जगता, आपलं जीवनमान सुधारण्यासाठी आपल्या पर्यावरणाचे संरक्षण आपल्याच हाती असते. यावेळी मी फक्त एवढेच म्हणेन "हिरवे व्हा, स्वच्छ श्वास घ्या."

mbk1801@gmail.com

# कोलाज



## मुलांनो सुट्टी सत्कर्मी लावा

वैशाली पाटील



उन्हाळा आणि सुट्टी हे समीकरण सर्व ज्ञात आहे. उन्हाळी सुट्ट्यांमध्ये एन्जॉय करण्यात वेळ कधी आणि कसा निघून गेला समजलेच नाही. या सुट्ट्यांमध्ये आपल्याला पुढे कोणत्या कॉलेजमध्ये प्रवेश घ्यायचा आहे. कोणते करिअर निवडायचे आहे याचा विचार करायचे राहूनच जाते. सुट्ट्या संपल्या की आपण मित्र-मैत्रिणींना भेटून कोण कोणते करिअर करणार याची चर्चा करायला लागतो. सुट्ट्यांमध्ये नातेवाईक, भावंड, मित्र- मैत्रिणींसोबत मज्जा केलेली असते. आता वेळ आलीय ती मेहनत करण्याची. मेहनत केली तर पुढील आयुष्यात मज्जाच मज्जा करायला मिळेल अशी पालकांची सूचना मिळत जाते.

स्वामी विवेकानंद म्हणायचे, कामातील बदल म्हणजेच विरंगुळा. मज्जा करू नका असं तुम्हाला कोणीच म्हणणार नाही. मज्जा करणं विरंगुळा हे महत्त्वाचं आहेच; परंतु सध्याच्या अति तीव्र स्पर्धेच्या आणि झटपट बदलणाऱ्या जगात सृजनात्मक आणि योजनापूर्वक विरंगुळा हा प्रभावशाली आणि फायद्याचा ठरतो.

सध्याच्या मुलांसाठी सुट्टीचा वापर शिक्षण, कौशल्यविकास आणि स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी केला तर पुढील काळात फलदायी आणि सर्जनात्मक होऊ शकेल.

**१. अभ्यासक्रमाची ओळख करून घेणे**

जर तुमची पुढील शिक्षणाची दिशा ठरली तर १० वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांनी विषयानुरूप अभ्यासक्रमाची ओळख करून घेणे उपयुक्त ठरेल.

**कमकुवत विषयांवर लक्ष :** ज्या विषयांमध्ये तुम्हाला अडचण येते, त्या विषयांची पुनरावृत्ती करा.

**प्रॅक्टिकल कौशल्ये :** विज्ञान विद्यार्थ्यांनी प्रयोगशाळेतील प्रयोगांचा सराव करता येईल. तसेच काही मूलभूत कौशल्ये जसे की घरकाम, थोडं फार जेवण बनवणे, घरातील उपकरणांची माहिती या गोष्टींच्या भविष्यकाळात परदेशात शिक्षणासाठी गेल्यास उपयोगी ठरतील.

**२. नवीन कौशल्ये शिकणे**

**संगणक कौशल्ये :** प्रोग्रॅमिंग (Python, Java), ग्राफिक डिझाइनिंग किंवा वेब डेव्हलपमेंट शिकणे.

**भाषा शिक्षण :** इंग्रजी, जर्मन, स्पॅनिश, जपानी, मंडारीन यांसारख्या परभाषा शिकण्याचा प्रयत्न करा.

**क्रेडिट कोर्सेस :** ऑनलाइन प्लॅटफॉर्म्सवरून लहान अभ्यासक्रम करून प्रमाणपत्रे मिळवा.

**३. व्यक्तिमत्त्व विकास**

**वाचन संस्कृती :** प्रेरणादायी पुस्तके, गोष्टीची पुस्तके, चरित्रे, बातम्यापत्रे वाचून ज्ञानवर्धन करा. यामुळे विचारांना चालना मिळते, शब्दकोश वाढतो आणि सुंदर व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो.

**सार्वजनिक बोलण्याचे कौशल्य :** टेड टॉक्स ऐकणे, डिबेट स्पर्धांमध्ये सहभागी होणे. आपापल्या ग्रुपमध्ये टेड टॉक्स आयोजित करणे अतिशय मजेशीर आणि प्रभावशाली उपक्रम आहे.

लेखन कला : ब्लॉग लिहिणे, कविता किंवा लघुकथा लिहिण्याचा सराव करा.

**४. शारीरिक आणि मानसिक आरोग्य**

**व्यायाम आणि योग :** रोजच्या दिनचर्यात व्यायाम, मुक्त खेळ, ध्यान किंवा योगासने समाविष्ट करा.

आरोग्यदायी आहार : पौष्टिक आहार घेणे, तो बनवण्यास आईकडून शिकणे, महत्त्व जाणून घेणे या गोष्टींचे महत्त्व कधीच कमी लेखता येणार नाही.

सर्जनात्मक कला : चित्रकला, संगीत, नृत्य, शिवणकाम, कुंभार काम, भरतकाम यांसारख्या कलांमध्ये रममाण होणे.

**५. सामाजिक कार्य आणि स्वयंसेवा**

**समाजसेवा :** जवळच्या एनजीओमध्ये स्वयंसेवक म्हणून काम करणे.

पर्यावरण जागृती : झाडे लावणे, प्लास्टिकमुक्त अभियानांना पाठबळ देणे.

**६. करिअरची रूपरेषा तयार करणे**

**करिअर मार्गदर्शन :** विविध व्यवसायांची माहिती घेणे, करिअर काऊन्सेलरशी संपर्क साधणे.

**इंटर्नशिप :** लहान प्रमाणात इंटर्नशिप करून व्यावहारिक अनुभव मिळवणे. तसेच बँकिंगशी संबंधित कार्यप्रणाली, दैनंदिन गरजेच्या बँक कामकाजाची प्रत्यक्षदर्शी ओळख करून घ्या.

सुट्टी ही वेळ न दवडता नवीन गोष्टी शिकण्याची, स्वतःला ओळखण्याची आणि भविष्यासाठी तयार होण्याची सुवर्ण संधी असते. योग्य नियोजन करून हा काळ सुंदर आणि उपयुक्त बनवता येतो. म्हणून, सुट्टीत स्वतःला वेगवेगळ्या क्षेत्रांत वाढवण्याचा प्रयत्न करा आणि हो यातील तुम्हाला आवडणाऱ्या गोष्टी करत असताना प्रवास आणि मज्जा करायला विसरू नका.

- "सुट्टी ही विश्रांतीची नसून, स्वतःला उंचावण्याची संधी आहे!"

# अजून येतो वास फुलांना...



डॉ. श्वेता चिटणीस



*"अजून येतो वास फुलांना,*
*अजून माती लाल चमकते,*
*खुरट्या बुंध्यावरी चढून,*
*अजून बकरी पाला खाते..."*

बा. सी. मर्ढेकर यांची ही कविता सांगते त्याप्रमाणे अजूनही जाई, जुई, मोगरा, चाफा... या फुलांना सुवास येतो आहे... या कवितेतून बोध घेऊन आपण वेळीच सावरायला हवे, आपले पसारे आवरायला हवेत... अन्यथा हवा आणि पाणी या दोन जीवनावश्यक स्त्रोतांचा वापर आपण कचरापेटीसारखा केल्यास जलप्रदूषण आणि वायू प्रदूषण वाढल्यास फुलांचे सुवास येणे कमी कमी होत जाते... शहरांपासून दूर, लहान शहर किंवा खेडेगावात गेल्यास तिथल्या फुलांना जो घमघमाट येतो, सुंदर सुवास येतो, त्यापेक्षा कैकपटीने कमीच, त्याच फुलांना शहरात सुवास येतो... हे सुहास आपल्या नाकापर्यंत आणि तिथून मेंदूपर्यंत पोहोचण्यामध्ये प्रदूषित हवा, ध्वनिप्रदूषण, व्यस्तता असे सारेच अडथळे येतात.

बा. सी. मर्ढेकर याच कविता म्हणतात...


*"भूकंपाचा इकडे धक्का,*
*पलीकडे अन् युद्ध - नगारे;*
*चहुकडे अन् एकाच गील्ला*
*जुन्या शवांवर नवीन निखारे..."*

१९५० साली लिहिलेली ही कविता प्रकृतीच्या अवहेलनेमुळे उडवलेल्या नैसर्गिक आपत्तीवर भाष्य करते. तसेच युद्धजन्य परिस्थितीवर सुद्धा भाष्य करते. आजही जगाच्या कोणत्या ना कोणत्या कोपऱ्यात वणवे, भूकंप, पूर अशा नैसर्गिक आपत्ती ओढवतात तरीही मानव त्यातून शिकत नाही, अनेक देशांमध्ये युद्ध तरी सुरू आहे किंवा युद्धजन्य परिस्थितीचे सावट आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा युद्धामुळे जीवितहानी होतेच आहे तरीही आपण बेसुमार जंगलांची कत्तल, हवेचे प्रदूषण, पाण्याचे प्रदूषण यात वाढ करत आहोत. तरीही फुलांनी सुहास पसरवणे सोडले नाही किंवा निसर्गाने झाडं वाढवणे सोडले नाही. त्यामुळे आपला असा समज झालेला आहे की, आपण काहीही केले तरीही निसर्ग सारं काही निभावून नेईल. समुद्र सगळा कचरा पोटात घेईल, जंगल वाढत राहतील, फुले फुलत राहतील, अन्नपुरवठा होत राहील. कारण आजही बऱ्याच लोकांना हवामान बदलल्यामुळे नैसर्गिक आपत्ती ओढवतात. त्याचा आणि आपला काहीच संबंध नाही असे वाटते व त्यामुळे हवातेवढा कचरा करा, प्लास्टिक समुद्रात टाका, घातांक रसायनांचा निचरा शुद्धीकरण न करता नदी नाल्यांमध्ये करा, काही फरक पडत नाही. इतक्या सगळ्या लोकसंख्येत मी एकट्याने कचरा केल्याने काय फरक पडणार आहे, असे ज्यांना वाटते त्यांनी काही विचार करावा की असे प्रत्येकालाच वाटू लागले तर निसर्गाचा ऱ्हास व्हायला वेळ लागणार नाही.

"तरीही येतो वास फुलांना..." हे आजच्या पिढीपर्यंत आपणही म्हणू शकतो; परंतु येणाऱ्या पिढ्यांसाठी शुद्ध हवा, शुद्ध पिण्याचे पाणी, नद्या, झाडं, समुद्र, फुले, पक्षी आणि इतर नैसर्गिक वारसा हे सारं सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी आपल्या पिढीवर आहे.

जागतिक पर्यावरण दिवसाची सुरुवात आपण किमान प्लास्टिकचा वापर कमी करण्याच्या विचाराने करूया. भाजीवाल्यांकडे, मिळणाऱ्या पातळ प्लास्टिकच्या पिशव्या वापरण्याऐवजी शक्य असेल तिकडे कापडी पिशव्यांचा वापर, बांबू किंवा ज्यूटमधून बनवलेल्या वस्तू, टिकाऊ भांडी यांचा वापर वाढवून टिकाऊ जीवनशैली अंगीकारल्यास हवामान बदलाचे दाह कमी करण्यात मदतच होईल.



# गुजराथ विद्यापीठाचे माजी कुलगुरू काकासाहेब कालेलकर

कोकण आयकॉन
सतीश पाटणकर



सुप्रसिद्ध गांधीवादी गुजराती साहित्यिक व शिक्षणतज्ज्ञ. त्यांचे संपूर्ण नाव दत्तात्रेय बालकृष्ण कालेलकर असले, तरी ते काका कालेलकर या नावानेच विशेष प्रसिद्ध आहेत. दत्तात्रेय बाळकृष्ण कालेलकर, ऊर्फ काकासाहेब कालेलकर हे थोर स्वातंत्र्यसैनिक, समाज सुधारक, इतिहासकर, शिक्षण तज्ज्ञ, पत्रकार, साहित्यिक तसंच भारतीय संस्कृतीचे गाढे अभ्यासक तथा गांधीवादी म्हणून परिचित आहेत. काकासाहेब कालेलकरांचा जन्म १ डिसेंबर १८८५ साली साताऱ्यास झाला. कालेलकर घराणे मुळचे सावंतवाडी जवळील कालेली गावचे. फर्ग्युसन महाविद्यालयातून ते १९०७ मध्ये बी.ए. झाले आणि एल.एल. बी.चे पहिले वर्ष पूर्ण केले. फर्ग्युसन महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण झाल्यावर काही काळ त्यांनी राष्ट्रमत या दैनिकात संपादकीय विभागात काम केलं. त्यानंतर बडोदा येथील गंगाधर विद्यालयात कालेलकर शिक्षक म्हणून रुजू झाले, पण या विद्यालयात 'सरकार विरोधी कारवाया चालतात' असे कारण दाखवून ब्रिटिश सरकारने हे विद्यालय बळजबरीने बंद केले.

गंगाधर विद्यालय बंद झाल्यावर काकासाहेब महात्मा गांधीजींच्या गुजराथ येथील साबरमती आश्रमाचे सदस्य झाले. तिथे असतानाच त्यांनी सर्वोदय या महात्मा गांधीजींच्या नियतकालिकाचे संपादक म्हणून काम पाहिले. हिंदी भाषेचा प्रचार आणि प्रसारासाठी मोलाचे योगदान बजावले, त्यासाठी हिंदुस्थानी प्रचार सभेच्या कामात सक्रिय सहभाग नोंदवला. भारत देशाचं ऐक्य टिकून राहण्यासाठी हिंदी भाषेच्या प्रचाराची नितांत आवशक्यता असल्याचे ते मानत, त्यासाठी त्यांनी भारतभर भ्रमणही केले. त्यांच्या मनावर आधी सावरकरांच्या क्रांतिकारी विचारांचा प्रभाव, पण पुढे महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाचा संस्कार होऊन ते पूर्णपणे गांधीवादी झाले. १९१७ साली ते अहमदाबादच्या गांधीजींच्या साबरमती आश्रमात गेले. १९३७ मध्ये ते वर्धा-सेवाग्रामला आले. गांधीजींच्या नवजीवन साप्ताहिकात ते लिहीत. गुजराती भाषा आत्मसात करून ते गुजरातीमधले नामवंत साहित्यिक झाले.

स्वातंत्र्याच्या आंदोलनात सतत भाग घेऊन त्यांनी बरेचदा कारावास सोसला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांची दोन वेळा राज्यसभेत नियुक्ती झाली. अनुसूचित जमातींच्या आयोगाचे अध्यक्ष म्हणून नेमले गेले. गुजराती साहित्य परिषदेचे अध्यक्ष तसेच हिंदी विश्वकोश समितीचे ते सदस्य होते. त्यांना भारत सरकारची 'पद्मविभूषण', 'साहित्य अकादमी'चे पारितोषिक व फेलोशिप असे बहुमानही मिळाले. त्याशिवाय अनेक विद्यापीठांनी त्यांना सन्मान्य अशी 'डी. लिट.'ची पदवीही अर्पण केली. त्यांना प्रवासाची विलक्षण हौस होती. हिमालय, ब्रह्मदेश, जपान, पूर्व आफ्रिका आणि संपूर्ण भारतभर त्यांनी प्रवास केला आणि गजराती भाषेत त्या प्रवासांची रसाळ आणि काव्यात्म वर्णने करून गुजराती साहित्यात प्रवास वर्णनांचे दालन समृद्ध केले. गुजराती भाषेतला पहिला शब्दकोश 'जोडणी-कोश' त्यांनीच तयार केला. तुरुंगात असतानाच त्यांनी उत्तरेकडील भिंती नावाचे पुस्तक लिहिले.

त्याशिवाय हिंडलग्याचा प्रसाद, वनशोभा, खेळकर पाने ही ललितगद्यपर पुस्तके लिहिली. रवींद्रनाथ टागोरांच्या 'गीतांजली'चा प्रभाव त्यांच्या मनावर होता व त्यातूनच 'रवींद्रमनन'सारखे पुस्तक निर्माण झाले. विष्णुभट गोडसे ह्यांचे माझा प्रवास'(१८५७ सालच्या बंडाची हकिकत) हे प्रवासाच्या हौसेमधूनच त्यांनी वाचले. ते वाचल्यावर त्यांना ते काल्पनिक पुस्तक -कादंबरी आहे, असे वाटले आणि त्यांनी इतिहासाचार्य चिं. वि. वैद्य ह्यांना पत्र लिहून तसे विचारले. ह्याचे कारण त्या पुस्तकाची भाषा हेही होते. त्यांच्या प्रवास वर्णनांची मराठीत भाषांतरे झाली व मराठी साहित्यात भाषांतरित प्रवास वर्णनांचे दालन खुले झाले. कालेलकरांची आमच्या देशाचे दर्शन अनुवाद : वामन चोरघडे, ब्रह्मदेशचा प्रवास अनुवाद : श्रीपाद जोशी, भक्तिकुसुमे अनुवाद : वामन चोरघडे 'लाटांचे तांडव' अनुवाद : वामन चोरघडे ही प्रवास वर्णने मराठीत आली. लोकमाता भारतातील नद्यांचे वर्णनही मराठीत आले होते. लेखक सतत लिहिता राहावा, हे कालेलकरांच्या संदर्भात सत्य ठरते.

महात्मा गांधीजींच्या प्रेरणेमुळे साकारलेल्या गुजराथ विद्यापीठाच्या स्थापनेत काकासाहेब कालेलकरांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. काही काळ कालेलकर गुजराथ विद्यापीठाचे कुलगुरूही होते. भारत स्वतंत्र झाल्यानंतर सहा वर्षांनी, म्हणजे १९५३ साली "मागासवर्गीय आयोग" नेमण्यात आला होता, काकासाहेब कालेलकर या आयोगाचे अध्यक्ष होते. १९५५ ला या आयोगाने आपला अहवाल सरकारला केला. या अहवालात दलित तसंच अस्पृश्यांसाठी अनेक कल्याणकारी योजनांची शिफारस करण्यात आली होती.

काकासाहेब कालेलकरांनी मराठी, इंग्रजी, हिंदी आणि गुजराती जनतेने सुद्धा त्यांच्यावर भरभरून प्रेम केले, कालेलकरांना गुजराती लोक आदराने "सवाई गुजराती" म्हणत असत. काकासाहेब कालेलकरांनी लेखन आणि शिक्षण क्षेत्रासाठी केलेल्या भरीव कामगिरीबद्दल भारत सरकारने १९६४ साली पद्मविभूषण पुरस्कार देऊन गौरविले, तर कालेलकरांच्या साहित्य क्षेत्रातील अतुलनीय कामासाठी १९६६ साली "जीवन व्यवस्था" या गुजराती भाषेतील निबंध संग्रहासाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार देण्यात आला. तर १९७१ साली "साहित्य अकादमीचे सदस्यत्व"ही बहाल करण्यात आले. २१ ऑगस्ट १९८१ साली वयाच्या ९६ व्या वर्षी काकासाहेब कालेलकरांचे वृद्धापकाळाने निधन झाले. काकासाहेब कालेलकरांना ९६ वर्षांचे टिळक-आगरकरांच्या कालखंडापासून इंदिरा गांधींच्या कारकिर्दीच्या अनुभवापर्यंत प्रदीर्घ आयुष्य लाभले.

# टोमॅटोचा झाला चिखल ;लाखो रुपये पाण्यात




प्रा. शुभम जैन / कडा

## अस्मानी: अवकाळीमुळे शेतकऱ्याच्या डोळ्यात अश्रू

कडा:तालुक्यातील पुंडी येथील सर्वसामान्य शेतकऱ्याने पोटाला चिमटा घेऊन अडीच एकराच्या क्षेत्रात एकरी दीड ते दोन लाख रुपये खर्चून टोमॅटोची लागवड केली. मात्र मान्सूनपूर्व पावसाने मे महिन्यातच हजेरी लावल्याने टोमॅटो पिकात अक्षरशः पाणी पाणी झाले. त्यामुळे टोमॅटो पिकाचा डोळ्यादेखत चिखल झाल्याने कृष्णा दादासाहेब थोरवे या शेतकऱ्याला लाखो रुपयांचा आर्थिक फटका अवकाळी पावसामुळे बसला आहे.

आष्टी तालुक्यातील कृष्णा दादासाहेब थोरवे या सर्वसाधारण कुटुंबातील तरुण शेतकऱ्याने भविष्यात टोमॅटो पिकाला चांगली बाजारपेठ मिळेल या आशेने अडीच एकर क्षेत्रात टोमॅटो पिकाची लागवड केली. झाडे बांधणी, खते, औषधे, फवारणी आणि मजुरी असा एकरी दीड ते दोन लाख रुपये खर्च करून टोमॅटोची अडीच एकरात मोठे कष्ट करून यशस्वी लागवड केली. मात्र आसमानी संकटाने त्यांच्या संपूर्ण आशा, अपेक्षांचा स्वप्नभंग केला आहे. नुकत्याच पान २ वर

### अपेक्षांचा स्वप्नभंग...

रात्रंदिवस मेहनत करून टोमॅटोला चांगली बाजारपेठ मिळेल, या आशेने अडीच एकरात टोमॅटोची यशस्वी लागवड केली. परंतु अवकाळी पावसाने शेतात पाणी पाणी झाल्याने डोळ्यादेखत टोमॅटोचा अक्षरशः चिखल झाला. त्यामुळे आमच्या सर्व आशा, अपेक्षांचा स्वप्नभंग झाला.

–कृष्णा दादासाहेब थोरवे,टोमॅटो उत्पादक शेतकरी

# देखभाल दुरुस्तीकडे कानाडोळा

बोंबला:पहिल्याच पावसात वीज यंत्रणा विस्कळीत



लोणार पुण्यभूमी

लोणार:मान्सूनपूर्व देखभाल दुरुस्तीचा गांभीर्याने विचार न करता केवळ वीज बिल वसुलीत मग्न असणाऱ्या महावितरण कंपनीच्या धोरणामुळे पावसाळ्यापूर्वीच वीज यंत्रणा विस्कळीत झाल्याचे चित्र आहे. शहरासह जिल्ह्यात अनेक भागात आजही वीज यंत्रणेतील त्रुटी समोर येत असल्याने वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रकार घडत आहेत. मार्च एंडिंगच्या घाईत मान्सूनपूर्व देखभाल दुरुस्ती करायची असते याचा जणू यंत्रणेला विसर पडल्याचे या निमित्ताने स्पष्ट झाले आहे.

मुख्य अभियंत्यांपासून लाईनमनपर्यंत सर्व घटकांना केवळ वीज बिल वसुलीचे उद्दिष्ट दिल्याने ही सर्व मंडळी वसुलीच्या कामात व्यस्त राहिली. केवळ मार्च महिन्यातच नाही, तर वर्षभर वसुलीचा घोळ सुरूच आहे. दरमहा इतका महसूल जमा झालाच पाहिजे ही अधिकाऱ्यांच्या मानेवरील टांगती तलवार अधिकाऱ्यांनाच नव्हे, तर लाईनमनला काही सुचू देत नसल्याचे महावितरणमधील सूत्राकडून सांगण्यात आले. मार्च एंडिंगची वसुली एप्रिल्या मध्यापर्यंत सुरू राहिल्याने यंत्रणा दुरुस्तीचे काम केव्हा करणार, असा सवाल कर्मचारी अधिकाऱ्यांतून केला जात आहे. पान २ वर

# पाटोदा येथे विद्यार्थ्यांचा गौरव

समारंभ:मराठी पत्रकार परिषदचा उपक्रम



पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा:येथे मराठी पत्रकार परिषद पाटोदाच्या वतीने दहावी व बारावी परीक्षेत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. तुकाराम तुपे होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी श्रीमती शेख मॅडम,व नायब तहसीलदार श्री. मुल्ला साहेब, उपपोलीस निरीक्षक भडके साहेब,पाटोदा गुप्तचर प्रमुख रियाज पठाण साहेब,आय काँग्रेस तालुकाध्यक्ष श्री.राहुल जाधव,ज्येष्ठ पत्रकार छगन मुळे, लिटल फ्लॉवर स्कूलचे मुख्याध्यापक पठाण सर, आवळे सर तसेच शिक्षण व पत्रकार क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.गुणवंत विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे:

वसंतराव नाईक महाविद्यालय पाटोदा (इ. दहावी):सानप ज्ञानदा किसनदेव, कुंभार सार्थक सोमनाथ,मस्कर कोमल गौतम

संत तुकाराम महाराज विद्यालय पाटोदा: दिपक विजय जावळे, शुभांगी जालींदर ढाकणे, सफिया जाफर मोमीन प्रियदर्शिनी महाविद्यालय पाटोदा:प्रगती प्रकाश घुमरे, आर्या बंडु तवार, वैष्णवी गोकुळ वीर भामेश्वर महाविद्यालय पाटोदा: मनोज शहादेव पवार, सृष्टी भास्कर शिंदे, श्रृती प्रताप ढवळे लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूल: जानकी अभिजीत वैद्य, असीम समीर सय्यद, ओमकार भाऊसाहेब सावंत

संत बाळूमामा हायस्कूल पाटोदा: सागर किसन मामडगे, बाजीराव विष्णू मोरे, रितेश गौतम वाघमारे,उर्दू शाळा पाटोदा:आर्शिया जावेद शेख,उनेजा सय्यद जहीर, सय्यद उमेआयमन अ. वाहीद जय भवानी कनिष्ठ महाविद्यालय (इ. बारावी): प्रणव नितीन बामदळे, मीना सुभाष नांदे

वसंतराव नाईक महाविद्यालय (इ. बारावी): प्राची प्रकाश भोसले, ओमराजे प्रवीण काळे, निखिल नितीन जाधव पद्मभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालय: मानसी माणिक जायभाय, वैष्णवी सुभाष मुंडे, प्रणव सतीश दिक्षीत महिला महाविद्यालय पाटोदा: संस्कृती गीते, रिया ऋषिकेश गायकवाड, सृष्टी वीरेंद्र नागरगोजे श्री जगदंबा विद्यालय, धनगरजवळका:रुपाली राजेश यादव, लक्ष्मण बंडुपंत काळे, श्रावणी बाळासाहेब टेकाळ जिल्हा परिषद माध्यमिक शाळा थेरला:वायबसे दुर्गा ज्ञानेश्वर, राख सानवी पांडुरंग, नागरे अंकिता बाबासाहेब, राख वैष्णवी भागवत, धनराज संजय सानप, जुवाना रहिम शेख, उमा श्रीरंग काकडे, संचित संतोष भवर वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालय, मुगाव: दहावीत दोन नंबर या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.या प्रसंगी मराठी पत्रकार परिषदेचे तालुका अध्यक्ष प्रा.अजय जोशी, जिल्हा उपाध्यक्ष कदरभाई मकरानी, सचिन पवार, उपाध्यक्ष शेख जावेद, अनिल गायकवाड, अशोक भवार, सचिव हमीद खान पठाण, सदस्य पवनकुमार भोकरे, दिगंबर नाईकनवरे, सतीश गर्जे, संजय सानप, सचिन शिंदे, सय्यद साजत यांच्यासह पालक व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन अत्यंत उत्तम व शिस्तबद्ध झाले. विद्यार्थ्यांनीही यशानंतर त्यांच्या शिक्षक, पालक व आभार मानले गोकुळ वीर भामेश्वर महाविद्यालय पाटोदा:मनोज शहादेव पवार, सृष्टी भास्कर शिंदे, श्रृती प्रताप पान २ वर

# पावसामुळे सौरऊर्जा प्रकल्पाचे नुकसान

फटका:धर्मराज मिटकरी यांचे झाले नुकसान

पुण्यभूमी प्रतिनिधी



कळंब:तालुक्यातील कन्हेरवाडी येथील धर्मराज पंडित मिटकरी यांच्या शेतातील गट नंबर ७८ मधील विजांच्या कडकडाटासह मुसळधार वादळी पावसामुळे सौरऊर्जा प्रकल्पाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे या विजांच्या कडकडाटासह वादळी पावसामुळे सौरऊर्जा प्रकल्पाचे दोन प्लेटावर तडे गेले आहेत आणि वायर खराब होऊन नुकसान झाले आहे या दोन प्लेटा आणि वायरचे झालेले नुकसानाची भरपाई शेतकरी धर्मराज मिटकरी यांनी पान २ वर

# सुनंदा कोरडेंचा झाला सन्मान

अभिनंदनिय:सिद्धेश्वरच्या सभागृहात देखणा सोहळा

पुण्यभूमी प्रतिनिधी



माजलगाव:भारतीय जनता पार्टी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मोत्सव समितीच्या वतीने श्रीमती सुनंदा प्रशांत कोरडे यांना अहिल्यारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संघर्षशील जीवन जगत, आप्तस्वकियांच्या मृत्यूचे दुःख पचवत, सामाजिक जबाबदारी समर्थपणे पार पाडल्याबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यासोबतच संयोजकाच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या १३ महिलांचा पुण्यश्लोक अहिल्यारत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. माजलगाव येथील सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या भारतमाता सभागृहात हा देखणा व नेत्रदीपक सोहळा पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख होते तर उद्घाटक म्हणून संस्कार भा प्रांताध्यक्ष स्नेहलताई पाठक होत्या. प्रमुख व्याख्याते म्हणून इतिहास अभ्यासक डॉ.अशोक बांगर यांनी अनमोल मार्गदर्शन केले. यावेळी अमरनाथ खुर्पे, डॉ .प्रशांत पाटील, देविदास नागरगोजे, प्रकाश दुग्गड, अभय कोकड, तुकाराम येवले आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन अशोक वाडेकर व गोविंद गोचडे यांनी पान २ वर



**परळी:** राजमाता अहिल्यादेवी होळकरांच्या ३०० त्रिशताब्दी जयंतीनिमित्त अभिवादन करतांना रानबा गायकवाड, भगवान साकसमुद्रे,संतोष कुंडकर, नवनाथ दाने,विकास वाघमारे, मंजूळनाथ कुकर आदी.

# राजमाता अहिल्यादेवींना अभिवादन



पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:तालुक्यातील टाकळी (अमिया) येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त माजी आमदार साहेबराव दरेकर यांच्यासह मान्यवरांकडून अहिल्यादेवींच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते अण्णासाहेब चौधरी, भाजपा प्रदेश समितीचे सदस्य अभिजीत शेंडगे, टाकळीचे सरपंच सावता ससाणे, हभप दादा महाराज चांगुने, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, दत्ता काकडे, दिगंबर बोडखे, राजेंद्र जैन, रघुनाथ कर्डिले, माजी उपसरपंच विष्णू निंबाळकर, सिद्धेश्वर शेंडगे, आम आदमी पार्टीचे सुहास चौधरी, ज्ञानेश्वर खोटे, आदिनाथ पान २ वर

धोरण

दिलासा:केजमध्ये प्रमाणपत्र वितरण सोहळा !

# नागरिक संघाला अधिकृत मान्यता !

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज : केजच्या जेष्ठ नागरिक संघाला नुकतीच 'फेडरेशन ऑफ सिनिअर सिटीजन्स ऑफ महाराष्ट्र' अर्थात 'फेसकॉम्' यांचे अधिकृत नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाले असून याचे रीतसर वितरण शुक्रवारी सायंकाळी केज येथे पार पडलेल्या विशेष कार्यक्रमात करण्यात आले. यावेळी फेसकॉम् मराठवाडा दक्षिण विभागीय अध्यक्ष डॉ दामोदर थोरात व विभागीय सचिव जगदीश जाजू यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

केज येथे नुकताच जेष्ठ नागरिक संघाची स्थापना करण्यात आली आहे. जेष्ठ नागरिकांच्या बदलत्या आयुष्यात अनेक कौटुंबिक, सामाजिक व प्रशासकीय अडचणी येतात. ज्यांनी आपल्या महत्वाच्या आयुष्यात क्रियाशील राहून कुटुंब, समाज व देशासाठी मोठे कार्य केलेले असते असे लोकच साठी ओलांडल्यानंतर चोहीकडून बेदखल होतात. अशा वेळी संघटनेच्या रूपाने त्यांना एकदुसऱ्याचा आधार बनून अशा अडचणी सोडवता याव्यात तसेच संघटनेच्या रूपाने एकत्र येऊन उर्वरीत आयुष्यात आनंद घेता यावा या उद्देशाने जेष्ठ नागरिक संघ कार्यरत आहे. केज शहरातही रामेश्वरजी जाजू, राजेसाहेब देशमुख, प्रकाश सेठ भन्साळी, जीबी गदळे, ॲड विनयकुमार कुलकर्णी, डी एस साखरे, उद्धव तरकसबंद, यांच्यासह इतर जेष्ठ नागरिकांन.या संघाचे फेसकॉम् अंतर्गत अधिकृत मान्यता प्रमाणपत्र केजच्या संघाला संघाचे केज शाखाध्यक्ष ॲड राजेसाहेब देशमुख व सचिव जीबी गदळे यांच्याकडे फेसकॉम् मराठवाडा दक्षिण विभागीय अध्यक्ष डॉ डी एच थोरात व सचिव जगदीश जाजू यांच्या वतीने सोपवण्यात आले. डॉ डी एच थोरात यांनी संघाच्या कार्यपद्धतीबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले तर सचिव जगदीश जाजू यांनी संघाच्या तांत्रिक नियम व उपक्रमाबद्दल माहिती दिली. यावेळी आंबेजोगाई जेष्ठ नागरिक संघाचे माजी अध्यक्ष कुंडलिक पवार, विद्यमान अध्यक्ष ॲड अनंतराव जगतकर, केजचे अध्यक्ष ॲड राजेसाहेब देशमुख यांनी पान २ वर

# सेवापुर्तीचा मान्यवरांकडून गौरव

ऋणानुबंध: सीईओ आनंद भंडारींकडून उमाप सन्मानित



पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी:अहमदनगर जिल्हा परिषदेतचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या प्रमुख उपस्थित जिल्हा परिषदेचे परिचर पदावर कार्यरत असलेले लहानु उमाप यांचा सेवापुरती कार्यक्रम संपन्न झाला.भारतीय सैन्यातून निवृत्त होऊन उमाप यांनी अहमदनगर जिल्हा परिषदेत सन २००५ रोजी रुजू झाले अत्यंत प्रामाणिक व पारदर्शक काम त्यांचा कडुन झाले आहे पुढील आयुष्य कुटुंबासाठी खर्च करून आरोग्यदायी जीवनाचा शुभेच्छा विविध मान्यवरांकडून उमाप यांना देण्यात आल्या या सेवापुरती कार्यक्रमात जिल्हा पान २ वर